CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सातारा
बुधवार, १ मे २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक १८१ । पाने १२। किंमत रु. ६/-




**तरुण भारत**

### उद्या अंक नाही!

बुधवार दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन निमित्त दै.सोलापूर तरुण भारत कार्यालयाला सुटी आहे. त्यामुळे गुरुवार, दि. २ मे २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

# काँग्रेसला साठ वर्षात जमले नाही ते आम्ही दहा वर्षात करून दाखविले : मोदी



**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.३० एप्रिल-**

काँग्रेसला साठ वर्षाच्या सत्ता काळात जे करता आले नाही ते आम्ही दहा वर्षात करून दाखविले. काँग्रेसने आपल्या साठ वर्षाच्या कारकिर्दीत 'गरिबी हटाव'चा केवळ नारा दिला व सत्ता उपभोगली परंतु आम्ही दहा वर्षात २५ करोड लोकांना गरीबीतून बाहेर काढले. याचे पुण्य तुम्हाला मिळणार आहे, कारण तुम्ही मला मत देऊन सत्तेवर आणले व या लोकांची सेवा करण्याची संधी दिली. त्यामुळे हे शक्य झाले. तुम्ही दिलेले प्रेम ही माझ्यासाठी मोठी ताकद आहे जीवनात एवढे प्रेम मिळाले याच्या पेक्षा काय सौभाग्य असू शकते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माढा लोकसभा मतदार संघातील उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ माळशिरस येथे महाविजय संकल्प सभेत बोलताना केले.

यावेळी व्यासपीठावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, शिवसेनेच्या नेत्या निलम गोरे, आ. जयकुमार गोरे,आ. गोपीचंद पडळकर,आ. बबनराव शिंदे, आ. संजय शिंदे, सदाभाऊ खोत, रश्मी बागल, दिलीप येळगावकर, प्रशांत परिचारक, आ. शहाजीबापू पाटील, दिपक साळुंखे, शिवाजी सावंत, आ.प्रसाद लाड, माळशिरसचे माजी नगराध्यक्ष डॉ आप्पासाहेब देशमुख, संजीवनी पाटील, चेतनसिंह केदार, के.के.पाटील, कल्याणराव काळे, रंजन गिरमे, डॉ. संजय पोळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते

पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, भारतातील ८० करोड लोकांना मोफत रेशन देण्यात आले. हे सरकार रस्ते, रेल्वे, विमानतळ यांच्या विकासासाठी खर्च करत आहे.काँग्रेस सरकारने दहा वर्षात रस्ते, रेल्वे यासाठी जेवढा खर्च केला तेवढा खर्च रस्ते व रेल्वे विकासासाठी आमच्या सरकारने एक वर्षात केला. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात व प्रत्येक नागरिकांच्या घरात पाणी पाणी पोहचविण्याचे माझे मिशन आहे. सिंचनाच्या ६३ योजना पूर्ण झाल्या आहेत अकरा करोड लोकांच्या घरी नळाचे पाणी पोहोचले आहे. विदर्भ मराठवाडा पाण्यासाठी तहानलेला ठेवण्याचे काम काँग्रेसने केले. परंतु त्या भागाला पाणी देण्याचे काम आमचे सरकार करत आहे. भाजपचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांच्या हितासाठी वेगळे सहकार मंत्रालय तयार केले. काँग्रेस सरकारमध्ये महाराष्ट्राचे कृषी मंत्री होते त्यावेळी उसाचा एफआरपी २०० रु प्रतिक्विंटल होता. तो आम्ही तीनशे पन्नास प्रतिक्विंटल केला. साखर कारखान्यांची जुनी इन्कम टॅक्स रक्कम माफ केली.आता केंद्रातून येणारा निधी शेतकऱ्यांना खात्यात सरळ जमा होत आहे. पूर्वी चाळीस हजार ईथेलॉनची निर्मिती केली जात होती ती आता ५०० करोड लिटर केली जात असल्याने त्याचा फायदा शेतकऱ्यांना उसाच्या दरवाढीमध्ये होत आहे. विकसित भारत बनवण्यासाठी महिलांची भूमिका मोठी आहे. एक करोड महिला लक्षपती दीदी झाल्या आहेत. पुढील काळात तीन करोड महिलांना लक्ष पती दीदी बनविण्याचा मानस आहे.

पंतप्रधान सन्मान योजना अंतर्गत तीन लाख करोड शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले असून त्यांना आत्मनिर्भर बनवण्यात आले आहे. स्वातंत्र्यानंतर लगेचचआयोध्येत राम मंदिर होणे अपेक्षित होते. परंतु काँग्रेसने राम मंदिरासाठी अडकाठी आणण्याचे काम केले परंतु तुम्ही केलेल्या मतदानामुळेच पाचशे वर्षांनी आयोध्येत राम मंदिराची उभारणी करू शकलो ते केवळ आपल्या ताकतीचे बळ असून त्याचे हक्कदार तुम्ही आहात. आपले एक मत भारत बनवण्यासाठी काम करणार आहे. खा निंबाळकरांना दिलेले मतदान हे मोदींच्या खात्यात येणार आहे, मोदी है तो गॅरंटी आहे. अब की बार चारशे पार असे सांगुन त्यांनी उमेदवार खा. निंबाळकरांना निवडून देण्याचे आवाहन केले

### माळशिरस तालुक्यातील ३६ गावांना पाणी देणारच : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

३६ गावात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या माध्यमातून पाणी पोहचविल्या शिवाय राहणार नाही .मागील लोकसभा निवडणुकीत खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी जे जे शब्द मतदारांना दिले होते ते मोदीच्या माध्यमातून पूर्ण केळे. पावसाळ्यात कृष्णेचे वाहून जाणारे पाणी उजनीत आणण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून जागतिक बँकेने यासाठी निधी देण्याचे मान्य केले असून त्यामुळे हा सुजलाम सुफलाम होणार आहे. यावेळी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर म्हणाले कि मी मागील निवडणुकीत दिलेले शब्द तंतोतंत पाळले असून कामे पूर्णत्वास नेली त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाणी सहकार्य केले. कृष्णा फ्लड ड्रायव्हेशन योजना पुढील काळात पूर्ण करण्यात येईल.रेल्वेचे कामहि लवकर सुरु होईल. यावेळी गोपीचंद पडळकर सदाभाऊ खोत, आ. बबनराव शिंदे आ शहाजी पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार रश्मी बागल यांनी मानले. यावेळी धनगर समाजाच्यावतीने घोंगड, काठी, बाळू मामाची मूर्ती देवून सन्मान करण्यात आला. माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख यांनी बैल गाडा देवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सन्मान केला.

### सभास्थळी मोदींचा माहोल

पंतप्रधान मोडी यांचे व्यासपीठावर आगमन होताच 'मोदी' मोदी' घोषणांनी परिसर दुमदुमण गेला.उन्हाचा चटका असताना देखील नागरिकांनी गर्दी केली होती,महिलांची उपस्थिती लक्षणीय होती, बसण्याची चांगली सोय करण्यात आली होती. सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने पार्किंग सोय सभेच्या ठिकाणा पासून लांब केली होती त्यामुळे नागरिकांना सभास्थानी येण्यास विलंब लागत होता.मोदींचे भाषण सुरु झाले तरी नागरिक येतच होते..नागरिकांना प्रवेशासाठी वेगळे प्रवेशद्वार, व्हीआयपीसाठी वेगळे प्रवेशद्वार केले होते. मोठा पोलीस बंदोबस्त होता. मात्र नागरिकांची संख्या जास्त असल्याने पाण्याची केलेली सोय अपुरी ठरली. जय श्रीराम, मोदी मोदी, अबके बर चारशे पार या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## ▶▶ महत्त्वाचे...

### केजरीवालांच्या अटकेसाठी हीच वेळ का निवडली?

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्य खूप महत्त्वाचे आहे, तुम्ही ते नाकारू शकत नाही, असे स्पष्ट करीत शेवटचा प्रश्न हा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यासाठी निवडलेल्या वेळेशी संबधित आहे. सार्वत्रिक निवडणुकीपूर्वीच केजरीवाल यांना अटक करण्यासाठी हीच वेळ का निवडली, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी ईडीला केली तसेच याबाबत शुक्रवारी उत्तर द्यावे, असा आदेशही दिला. केजरीवाल यांच्या अटके विरोधात दाखल याचिकेवर मंगळवारी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपांकर दत्ता यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली.

### राष्ट्रपती मुर्मू आज घेणार रामललाचे दर्शन

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बुधवारी अयोध्येत राम ललाचे दर्शन घेणार असल्याची माहिती राष्ट्रपती भवनाने मंगळवारी दिली. नवीन मंदिर उभारल्यानंतर तसेच २२ जानेवारीला झालेल्या रामललाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर द्रौपदी मुर्मू यांचा हा पहिलाच दौरा आहे. राष्ट्रपती १ मे रोजी अयोध्येला भेट देतील, असे राष्ट्रपती भवनाने निवेदनात म्हटले आहे. अयोध्येतील मुक्कामादरम्यान राष्ट्रपती श्री हनुमान गढी मंदिर, प्रभू श्री राम मंदिर आणि कुबेर टिला येथे दर्शन आणि आरती करतील. त्या सूर्यपूजा आणि आरतीही करणार आहेत, असे राष्ट्रपती भवनाने म्हटले आहे.

### मार्चमध्ये महत्त्वपूर्ण पायाभूत क्षेत्रांतील वृद्धी ५.२ टक्के

**नवी दिल्ली :** मार्चमध्ये आठ प्रमुख पायाभूत सुविधा क्षेत्रांची वाढ ५.२ टक्क्यांवर पोहोचली, असे मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिकृत आकडेवारीत म्हटले आहे. मात्र, यंदा फेब्रुवारीच्या तुलनेत वाढीचा दर कमी आहे. मागील महिन्यात तो ७.१ टक्के होता. कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट, वीज या आठ प्रमुख क्षेत्रांची वाढ मार्च २०२३ मध्ये ४.२ टक्के होती.

### पंतचे पुनरागमन, के. एल. राहुलला वगळले

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यात अमेरिका व वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तात्पुरता भारतीय संघ जाहीर केला आहे. कर्णधार रोहित शर्मा, तर हार्दिक पांड्या उपकर्णधार असेल. २०२२ मध्ये कार अपघातातून सावरल्यानंतर ऋषभ पंतने संघात पुनरागमन केले; मात्र स्टार फलंदाज के. एल. राहुलला वगळण्यात आले आहे.

# सोलापुरात उष्णतेची लाट; पारा ४४ अशांवर

## यंदाच्या वर्षातील सर्वाधिक तापमानाची नोंद तर राज्यातही उच्चांकी!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

सोलापुरात उष्णतेची लाट सदृश्यस्थिती असून यंदाच्या वर्षातील उच्चांकी ४४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद मंगळवार, ३० एप्रिल रोजी सोलापुरात झाली आहे. सोलापुरात राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाल्याचे वृत्त आहे. एप्रिल अखेरीस इतके उच्चांकी तापमान म्हणजे मे महिन्यात यंदा पारा ४५ अंश पार जाणार अशी भितीही नागरिकांतून व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे सोलापूर राजकीयदृष्ट्याही तापलेले जाणवत आहे.



सोलापुरात फक्त दिवसाच नाही तर रात्रीही उकाड्या हैराणी सुरु आहे. मंगळवारी दिवसभर रस्ते सामसूम होते तर घराच्या टाकीतील पाणी उकळते झाल्याने नळाला गरम पाणी होते. एसी, कुलर देखील क्षमतेने काम करत नसल्याने सोलापूरकर पुरते हैराण होते. हवामान विभागाने रात्री 'वार्म नाईट'चा इशारा दिला आहे. रात्रीचे तापमान हे जेव्हा ३५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असते तेव्हा वार्म अलर्ट दिला जातो. रात्रीही दिवसा सारखाच उकाडा जाणवतो. राज्यामध्ये तापमानाचा पारा रविवारी चढा होता. सोलापुरातही कमाल तापमानाचा पारा ४४ अंश सेल्सिअस असल्याची नोंद झाली, नुकतेच रविवारी सोलापुरात ४३.७ अंशी सेल्सियस तापमानाची नोंद झाली होती. एप्रिलमधील ही दुसरी उष्णतेची लाट होती. या वाढत्या तापमानामुळे सकाळी नऊपासूनच उकाडा जाणवत असून यात अबालवृद्धांना मोठा त्रास होत आहे. उन्हाचे चटके बसत असल्याने नागरिकांनी रस्त्यावरून फिरणे टाळले आहे. दुपारी बारा ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रस्त्यावरची वाहतूक तुरळक आहे. अंगावर पुरुषांकडून उन्हाळी टोप्या, गॉगल, खांद्यावर पांढरे गमजे तर महिलावर्ग तोंडावर स्कार्फ, हातांना सॉक्स, गॉगल घालून फिरताना दिसत आहेत. परंतु ज्यांचे हातावर पोट आहे, अशा कष्टकरी व हमालांना भर उन्हात कामे करावी लागत आहेत.

| गेल्या काही दिवसात ४० अंशाच्या पुढेच तापमान | |
|---|---|
| २४ एप्रिल | ४१.२ |
| २५ एप्रिल | ४१.१ |
| २६ एप्रिल | ४१.२ |
| २७ एप्रिल | ४३.७ |
| २८ एप्रिल | ४३.७ |
| २९ एप्रिल | ४२.९ |
| ३० एप्रिल | ४४.० |

# योगी आदित्यनाथ यांची आज सोलापुरात सभा

### भव्य मंडपाचे काम अंतिम टप्प्यात

### सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची प्रचार सभा उद्या बुधवारी १ मे रोजी दुपारी १.३० वाजता वालचंद शिक्षण महाविद्यालयाजवळील वल्याळ मैदानावर होणार आहे. सोलापूर लोकसभेचे भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ ही सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सभेची वेळ दुपारी १.३० ची असल्यामुळे नागरिकांना उन्हापासून बचावासाठी वल्याळ मैदानावर भव्य मंडप उभारण्यात येत असून मंडपाचे काम अंतिम टप्प्यात आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची सभा सोलापूरात आयोजित करावी, अशी भाजपा कार्यकर्त्यांची आणि नागरिकांची मागणी होती. त्यामुळे या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदुत्वाची धडाडणारी तोफ म्हणून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना ओळखले जाते. तरुण वर्गामध्ये त्यांची मोठी लोकप्रियता आहे. भारतीय जनता पार्टी आणि महायुतीतील मित्र पक्षांकडून योगी आदित्यनाथ यांच्या सभेची जोरदार तयारी करण्यात येत आहे. या सभेसाठी सोलापूरकरांची मोठी गर्दी होणार हे लक्षात घेऊन सभेसाठी आसन व्यवस्था तयार करण्यात येत आहे. योगी आदित्यनाथ यांच्या सभेसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी आणि महायुतीकडून करण्यात आले आहे. दरम्यान, भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते व भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी मंगळवारी सभेच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी राम सातपुते म्हणाले, योगी आदित्यनाथ यांचे विचार ऐकण्याकरिता त्यांची सोलापूरात सभा व्हावी, असा आग्रह भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आणि नागरिकांकडून करण्यात येत होता. त्यामुळे ही सभा आयोजित करण्यात आली आहे. सोलापूरकरांनी प्रचंड मोठ्या संख्येने या सभेस उपस्थित रहावे, असे आवाहनही आमदार राम सातपुते यांनी याप्रसंगी केले.



# मुंबईत महायुती, मविआतील लढती स्पष्ट

## रवींद्र वायकर, यामिनी जाधवांना महायुतीची उमेदवारी

### उत्तर मुंबईतून काँग्रेसचे भूषण पाटील उमेदवार

**मुंबई ३० एप्रिल-**

महायुतीचे उमेदवार म्हणून शिवसेनेचे आमदार रवींद्र वायकर यांना मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदार संघातून, आमदार यामिनी जाधव यांना मुंबई दक्षिणमधून तर उत्तर मुंबईमधून काँग्रेसने भूषण पाटील यांना उमेदवारी दिली. त्यामुळे मुंबईतील सहाही मतदार संघात होणाऱ्या लढती स्पष्ट झाल्या असून, ठाकरे गटाचे उमेदवार अरविंद सावंत यांच्याशी शिवसेनेच्या यामिनी जाधव यांची, तर ठाकरे गटाचे अमोल कीर्तीकर यांची शिवसेनेचे रवींद्र वायकर यांच्याशी लढत होणार आहे. उत्तर-मुंबईत भाजपाचे पीयूष गोयल यांची काँग्रेस उमेदवार भूषण पाटील यांच्याशी लढत होणार आहे.

महायुतीत भाजपा आणि शिवसेनेला प्रत्येकी तीन लोकसभा मतदारसंघ मिळाले. तर, मविआमध्ये ठाकरे गटाला चार व काँग्रेसला दोन जागा मिळाल्या आहेत. लोकसभा होण्यात येणार असून, यात मुंबईतील सहा मतदार संघासह एकूण १३ मतदार संघांचा समावेश आहे. पालघर ठाणे कल्याण आणि नाशिक येथेही २० मे रोजी मतदान पार पडणार असून, या तिन्ही लोकसभा मतदारसंघात महायुतीने अद्याप उमेदवार जाहीर केले नाही. कल्याण लोकसभा मतदार संघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत यांनी प्रचार सुरू केला असला, तरी अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली नाही.

### मुंबईतील लढत

१. **दक्षिण मुंबई** - यामिनी जाधव (शिवसेना) विरुद्ध अरविंद सांवत (उबाठा) २. **ईशान्य मुंबई** - मिहीर कोटेजा (भाजपा) विरुद्ध संजय पाटील (उबाठा) ३. **दक्षिण-मध्य** - राहुल शेवाळे (शिवसेना) विरुद्ध अनिल देसाई (उबाठा) ४. **उत्तर मुंबई** - पीयूष गोयल (भाजप) विरुद्ध भूषण पाटील (काँग्रेस) ५. **उत्तर-मध्य मुंबई** - उज्ज्वल निकम (भाजपा) विरुद्ध वर्षा गायकवाड (काँग्रेस) ६. **उत्तर-पश्चिम** - रवींद्र वायकर (शिवसेना) विरुद्ध अमोल कीर्तीकर (उबाठा)

# कोणत्याही स्थितीत नौदलाने सज्ज राहावे

**नवी दिल्ली, ३० एप्रिल**

समुद्रातील संभाव्य शत्रूंना रोखण्यासाठी भारतीय नौदलाने नेहमी सज्ज राहावे, असे ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी यांनी मंगळवारी २६ वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सांगितले.

दळणवळण आणि इलेक्ट्रॉनिक्स युद्धतज्ज्ञ असलेल्या ॲडमिरल त्रिपाठी यांनी आर. हरिकुमार यांच्याकडून नौदलाचा कार्यभार स्वीकारला. हुथी अतिरेक्यांनी विविध व्यापारी जहाजांना लक्ष्य केल्यामुळे लाल समुद्र आणि एडनच्या आखातात विविध धोरणात्मक जलमार्ग सुरक्षा आव्हाने निर्माण झाली असताना ॲडमिरल त्रिपाठी यांनी नौदलप्रमुख म्हणून सूत्रे स्वीकारली आहेत. मागील काही वर्षांमध्ये आमचे नौदल लढाईसाठी सज्ज, एकसंध, विश्वासार्ह आणि भविष्यावर नजर ठेवून विकसित झाले आहे, असे ॲडमिरल त्रिपाठी यांनी पत्रकारांना सांगितले.



भारतीय नौदलाने समुद्रातील संभाव्य शत्रूंना शांततेत परावृत्त करण्यासाठी आणि समुद्रात युद्ध जिंकण्यासाठी सदैव कार्यरत असले पाहिजे, असे सागरी क्षेत्रातील विद्यमान आणि पदयोन्मुख आव्हाने सांगत आहेत. हे माझे एकमेव लक्ष्य आणि प्रयत्न राहील, असे त्रिपाठी यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### पत्रकार रोहित पाटील यांना डॉक्टरेट पदवी

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

पत्रकार रोहित पाटील यांना वर्ल्ड पिस ऑफ युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटीच्यावतीने डॉक्टरेट पदवी प्रधान करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी डॉक्टरेट ही पदवी मिळाली आहे. बांगलादेशचे मंत्री शबन महमूद, अर्जुन पुरस्कार विजेत्या आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू डीएसपी हरियाणाच्या नेहा राठी यांच्या हस्ते विद्यापीठाने नवी दिल्ली येथे आयोजित दीक्षांत समारंभात डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बी. सिंग, अभिनेत्री दिया मिर्झा यांची उपस्थिती होती. वर्ल्ड पिस ऑफ युनायटेड नेशन्स यूनिवर्सिटी ही अभिमत विद्यापीठ असून युनायटेड स्टेसस ऑफ अमेरिका, स्टेट ऑफ कोलोरॅडोची मान्यताप्राप्त आहे. शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास अश्या विविध विषयावर पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक बांधलकी म्हणून गेल्या अनेक वर्षापासून दिलेल्या योगदानाबद्दल हा पदवी देण्यात आली आहे.



### सेवा भारती जिल्हा सोलापूरची व्यापक कार्यकारिणीची बैठक

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

सेवा भारती जिल्हा सोलापूरची व्यापक कार्यकारणीची बैठक मंगळवारी पार पडली. यावेळी सेवाभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कोषाध्यक्ष सुधीरजी जवळेकर, पुणे विभाग संयोजक लक्ष्मीकांत देशपांडे, प्रांताचे रुग्णोपयोगी साहित्य केंद्र प्रकल्प प्रमुख संजयजी धर्माधिकारी, सेवाभरती सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष राजेशजी पवार,सचिव बाबुलालजी वर्मा, सहसचिव रंगनाथ जोशी, संघाचे जिल्हा सेवा कार्यप्रमुख श्री करपेजी, प्रांताचे पूर्णवेळ कार्यकर्ते शिवानंदजी कुंभार, आयाम प्रमुख सर्वश्री बजरंगजी कुलकर्णी, मोरेश्वरजी काटवे, अनुपमाजी देगावकर, शैलजाताई मुरूमकर मेघनाजी झांबरे, किरणजी कोल्हापुरे, प्राध्यापक शिवराजजी पाटील आदी उपस्थित होते.

### सोलापुरात आज खासगी क्षेत्रातील पेन्शनधारकांचा मेळावा

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

कामगार दिनाचे औचित्य साधून शहर व जिल्ह्यातील खाजगी क्षेत्रातील ईपीएस९५ पेन्शनधारकाचा मेळावा एक मे रोजी सकाळी ११ वाजता रिलायन्स मार्केट समोरील संत चोखामेळा विठ्ठल मंदीरात होईल. तरी शहर व जिल्हयातील खाजगी क्षेत्रातील पेन्शनधारकांनी उपस्थित रहावे, असे ईपीएस९५ निवृत्त कर्मचारी समन्वय व लोककल्याण संस्थेचे शहराध्यक्ष शशिकांत भुसारे यांनी कळविले आहे.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३० एप्रिल-**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पौड रोड शाखा व कला संस्कृती आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयडॉल २ या स्पधचे आयोजन केले होते. लॉ कॉलेज रोड वरील आगाशे शाळेच्या हॉल मध्ये झालेल्या कार्यक्रम ला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गायन, वादन, नृत्य, नाट्यछटा या विभागात ५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला. आठ वर्ष ते ८४ वर्षाच्या जेष्ठापर्यंत सर्वांचा यात समावेश होता.

महाराष्ट्राच्या पारंपरिक नृत्यशैली वर आधारीत वेशभूषा व त्याला साजेसा अविष्कार आपल्या नृत्यातून, गाण्यातून, नाट्यछटेतून सादर करण्यात आले. संतूर, कॅसिओ, पेटी, माऊथ ऑर्गन सारख्या वादकांनी या स्पर्धे ला रांगत आणली. विशेष मुलीं स्पर्धकांनी रसिकांची मने जिंकली



**स्पर्धेचे विजेते (प्रथम तीन ) :** गट १ (१६ वर्षापर्यंत) अद्वैत तांबेकर (नृत्य), ईश्वरी कुलकर्णी (गायन) ध्रुव वाघोलीकर (वादन) गट २ (१६ ते ५० वर्षे : प्रीती नगरकर (नृत्य), दीपिका तांबेकर (गायन), श्वेता लिमये (गायन) गट ३ (५० वर्षाच्या पुढे) : मीनल गानू (गायन), दयाकर दाबके (गायन), मेघा जोशी (वादन). विशेष उल्लेखनीय : सुरेश फडणीस.

प्रत्येकात एक कला दडलेली असते व अशा कलाकारांना एक व्यासपीठ मिळून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे उदगार पुणे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे यांनी काढले.सौ केतकी कुलकर्णी (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी) यांनी प्रास्ताविक केले. प्रदेश कार्याध्यक्ष निखिल लातूरकर यांनी नांदेड वरून येऊन आवर्जून या कार्यक्रमाला उपास्थिती लावली व स्पर्धेकांना शुभेच्छा दिल्या. गणेशस्तवन सौ सीमा रानडे यांनी आपल्या मधुर स्वरात केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपा केळकर यांनी केले. मंजुषा खिरवडकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन विवेक खिरवडकर (पौड रोड शाखा अध्यक्ष), उदय सुभेदार (कला संस्कृती आघाडी अध्यक्ष), गीता देशमुख (उपाध्यक्ष), दीपक कुलकर्णी (उपाध्यक्ष), रवींद्र रानडे, माधव तिळगूळकर, अनिरुद्ध पळशीकर यांनी केले.

कार्यक्रमाला मकरंद कुलकर्णी, दत्तात्रय देशपांडे, सौ.जयश्री घाटे, डॉ अरुण जोशी, चित्रा जोशी,अजित खरे, अमोघ पाठक, ऋचा पाठक, अमोल व तृप्ती कुलकर्णी उपस्थित होते.

पाच परीक्षकांच्या टीमने सर्व आवश्यक निकषावर स्पर्धेचा निकाल दिला. यात सौ गौरी शिकारपूर, सानिका खरे, नीता शेबेकर, राजश्री महाजनी व मिलिंद कुलकर्णी यांचा समावेश होता. शेवटपर्यंत उत्कंठा लागून राहिलेल्या स्पर्धेची यशस्वी सांगता झाली.

# वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान उत्सव अध्यक्षपदी आप्पासाहेब मनगुळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**





जगत ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या उत्सव समिती अध्यक्षपदी आप्पासाहेब मनगुळी यांची तर कार्याध्यक्षपदी शशिकांत बिराजदार यांची निवड करण्यात आली.

यंदा महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त ३ मे ते १० मे दरम्यान बसव सप्ताह अंतर्गत विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तसेच आधार कार्ड, पॅनकार्ड व रक्तदान शिबिर, आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार, पाणपोई, वचन पाठांतर स्पर्धा, निबंध स्पर्धा, महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंडपातील विविध संतांच्या वेशभूषा स्पर्धा, वृक्षारोपण, रस्त्यावर उन्हात किरकोळ व्यवसाय करणाऱ्यांना जम्बो छत्री वाटप, समाजातील गरजूंना मोफत कायदेशीर सल्ल्यासाठी विधी कक्ष,भजन स्पर्धा असे भरगच्च कार्यक्रम होतील.

माजी पोलीस उपायुक्त दीपक आर्वे यांच्या अध्यक्षतेखाली व सामाजिक कार्यकर्ते सुदीप चाकोते, सिद्धया स्वामी हिरेम ठ, जंगम समाजाचे जिल्हाध्यक्ष राजशेखर कंदलगावकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राज शेखर विजापुरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पदाधिकारी निवडण्यात आले. त्यांचा सत्कार सिद्धया स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन मल्लेश पुरवंत यांनी केले. प्रास्ताविक मंगेश स्वामी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सोमा शरणार्थी यांनी मानले.

**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्ष- राचप्पा आरळीमार, आशुतोष पुरवंत, खजिनदार- विजयकुमार तंबाके,सांस्कृतिक प्रमुख -सुनील रामशेट्टी, शिवानंद बळोळी.

# धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत वृक्षारोपणाच्या निकषांचा फज्जा

**तभा वृत्तसेवा । सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि.३० एप्रिल -**

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत कन्नड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान तात्कालीन ऐतिहासिक व वैभवशाली वृक्ष तोड करण्यात आली. सदर वृक्षतोड बदल्यात महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामाच्या वेळेस रस्त्याच्या मधोमध व दुतर्फा वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले. त्याकाळी पर्यावरण प्रेमींनी या वृक्ष तोडीचा विरोध केला होता. त्या काळात वेळोवेळी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सदर रस्त्याचे गत वैभव पुन्हा निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते.




**सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड**

सदर वृक्षरोपण व त्याचे संगोपन बाबत इंडीयन रोड काँग्रेस यांच्या वतीने ९० पानी निकष व मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आले आहेत. सदर निकष व मार्गदर्शक तत्वे यांची अंमलबजावणी अत्यंत कठोर पद्धतीने अमलात आणण्याचे आदेश आहेत. या निकषांनुसार या महामार्गावर वृक्ष लागवड व संगोपन केले की नाही? हे आपण बघणार आहोत. तूर्तास सदर निकष व मार्गदर्शक तत्वे काय आहेत हे आधी बघुया...

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग यांच्या कडून रस्त्यांच्या मध्यभागी किंवा दुतर्फा लावण्यात येणार झाडे ही इंडियन रोड काँग्रेसच्या तपशील क्रमांक-२१-२००९ नुसार वृक्षलागवड करण्यात येते, रस्त्यांच्या मध्यमागी धूळ रोखण्यासाठी, चालकांच्या डोळ्यावर रात्रीच्या वेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांचे तीव्र प्रकाशापासून सरंक्षण व्हावे यासाठी या वनस्पतींची लागवड करण्याचे मार्गदर्शक तत्वे इंडियन रोड कॉग्रेस यांनी दिले आहेत. बोंगनवेल, टीकोमा, शंकासुर, डुरंडा आदी वनस्पतींची लागवड करावी असे निर्देशीत केले आहे तर रस्त्यांच्या कडेला पहिल्या ओळींत गुलमोहर,कांचन,जकरंडा, पिलमोहर, विलायती बाभूळ आदी यासारख्या शोभेचे झाडे लावावीत, असे निर्देश आहेत . त्याचप्रमाणे दुसऱ्या ओळीत काळा शिरीष, अर्जुन, सिसम, सिल्व्हओक आदी यांसारखी कमी सावली देणारे झाडे आहेत. तर तिसऱ्या ओळीत चिंच, आंबा, मोह, कडुलिंब, वड, पिंपळ आदी यांसारखी दाट सावली देणारे झाडे हवामानानुसार अशी झाडे लावावी, असे निर्देश इंडियन रोड कॉग्रेस यांचे आहेत. वृक्ष लागवड करत असताना रस्ताच्या मध्ये आणि दुतर्फा खड्ड्यांचा आकार खोली रुंदी लांबी ६०६०६० सेंटीमीटर असायला हवी तर एक तृतीयांश भाग हा शेणखत, गांडूळखत आदी चांगल्या प्रकारच्या खतांनी भरलेला असावा तर वृक्षरोपण करता असताना उर्वरित जागेत सुपीक मातीने भरायला हवा,तर रस्त्यांच्या कडेला लागवडीच्या वेळी रोपांची उंची२ मीटर पेक्षा जास्त उंचीचे (०६.५६ फूट) असायला हवी तर रस्त्यांच्या मध्यमागी ०.६ मीटर (१.९६ फूट)असायला हवी, वृक्षारोपण झाल्यानंतर त्यांचे जनावरांपासून, वाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी लोखंडी, विटांचे,किंवा सिमेंटांचे संरक्षक जाळी किंवा स्थानिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या संरक्षणाची खात्री असेल तर बांबूचे संरक्षण वापरावे असे निर्देश क्रमांक ११.१५ मध्ये आहेत. तर या वृक्षांच्या लागवडी पासून सहा ते सात वर्षांपर्यंत म्हणजेच वृक्षांची आकार आणि वाढ होईपर्यंत प्रत्येकी एका वृक्षांना साडे चारशे ते सहाशे पन्नास लिटर पाणी उपलब्ध करावे तसेच लागवड केलेल्या वृक्षांपैकी प्रथम वर्षी किमान ९० टक्के झाडे जगवावी असे स्पष्ट निर्देश इंडियन रोड कॉग्रेसच्या ११.१४.१ या मार्गदर्शिका मध्ये आहे. **क्रमशः...**





इंडियन रोड कॉंग्रेसच्या निर्देशानुसार वृक्ष लागवड करण्यात आले आहे. आम्ही खाजगी कंत्राटदाराला सर्व सूचना देऊन वृक्ष लागवड करताना आमच्या कर्मचाऱ्यांनी स्वतः लक्ष ठेवून वृक्ष लागवड करून घेतली आहे

**- रवींद्र इंगोले, प्रकल्प संचालक**
**भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

## १ मे, कामगार दिन विशेष

# मेहनतीला सन्मान, अधिकार एकसमान

**देश जागतिक पातळीवर विकासाच्या नवनवीन पायऱ्या पार करत असताना कामगारांची उत्तम साथ वेगळा वेग प्रदान करेल. या पृष्ठभूमीवर अलिकडच्या कामगार संहितेची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात येते. कामगार कायद्यांमधील सुयोग्य बदलामुळे सर्व स्तरांमधील आणि क्षेत्रांमधील कामगारांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्याचा प्रयत्न आहे. कामगार दिन साजरा करताना ही लक्षवेधी बाब विचारात घ्यावी लागेल.**



कामगार दिनाच्या पृष्ठभूमीवर कामगार संहितेबद्दल बोलणे आणि त्या अनुषंगाने बघायला मिळणाऱ्या वा अपेक्षित असणाऱ्या बदलांवर चर्चा करणे सयुक्तिक ठरेल. मुळात सुरुवातीपासून मोदी सरकारचे कामगारविषयक धोरण सुस्पष्ट आणि कामगार व मालक या दोन्ही वर्गांमधील दरी तसेच तणाव दूर करण्याचे राहिले आहे. २०१७-१८ पासूनच त्यांनी कामगार प्रश्नांविषयी ठाम धोरणे जाहीर केली. त्याअंतर्गत 'मेहनत को सन्मान, अधिकार एकसमान' या घोषवाक्यानुसार काम सुरू झाले. या मेहनतीचा सन्मान करण्याच्या धोरणांतर्गत संघटित आणि असंघटित या दोन्ही वर्गातील कामगारांबरोबरच रोजंदारी कामगार, रस्त्यावरील विक्रेते आदींच्या हक्क आणि अधिकारांवरही गांभीर्याने विचार केला गेला. प्रामुख्याने कोविडनंतरच्या काळात त्यांच्या लाभाचे नवनवीन प्रस्ताव मांडले गेले आणि त्यानुसार कायदे करून अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली. परिणामी सर्व कामगारांना समान अधिकार या तत्त्वाची पाठराखण होताना आता पाहायला मिळत आहे.

**आशय अभ्यंकर**
प्रख्यात अभ्यासक

पूर्वी कामगारविषयक धोरणे ठरवताना सरकारकडून पुढे येणाऱ्या योजना सरधोपट पद्धतीने आकारात यायच्या. त्यासाठी आधारभूत मानावी अशी कोणतीही ठोस आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध नव्हती. उदाहरणार्थ वेगवेगळ्या गटांमध्ये किती कामगार कार्यरत आहेत, संघटित तसेच असंघटित क्षेत्रात किती श्रमशक्ती आहे, रोजंदारी तत्त्वावर देशातील किती कामगार काम करतात, रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या किती आहे; या संबंधीची कोणतीही माहिती विश्वासार्ह पद्धतीने पुढे आली नव्हती. त्यामुळेच नंतरच्या काळात सरकारने कामगार विषयक धोरण ठरवताना स्पष्ट विचारांती पावले उचलली. त्यासाठी सर्वप्रथम त्या त्या क्षेत्राची सखोल माहिती, आकडेवारी जमा करण्याचे धोरण ठरले. त्यातून पुढे आलेली माहिती समोर ठेवूनच कामगारविषयक कायदे होतील, हेच त्यांचे सुरुवातीपासूनचे धोरण होते. त्यानुसार सविस्तर अभ्यास करून २०२२-२३ मध्ये नवीन कामगार संहिता समोर आली. त्यामध्ये सरकारने किमान वेतनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आणि सार्वत्रिक केली. त्यामुळेच कामगारांना निर्धारित वेळेत किमान वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. आता कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना या नियमांचा मोठा फायदा मिळत असल्याचे दिसत आहे. आपण केलेल्या कष्टाचे, कामाचे पैसे वेळेत मिळाल्यास अनेक तक्रारी, अडचणी दूर होतात. हे लक्षात घेता आता वेळेत मोबदला मिळत असल्याचा लाभ कामगार वर्गाला मिळत आहे.

पूर्वी कामगार वर्गाला कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची हमी नव्हती. काम करताना आपण सुरक्षित आहोत का, हा प्रश्न कायमच भेडसावत असायचा. मात्र, नव्या कामगार कायद्यांमध्ये कामगारांच्या जीविताच्या सुरक्षेला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. साहजिकच यामुळे कार्यस्थळाचे वातावरण सुधारले आणि काम करणे सुरक्षित तसेच सुसह्य झाले. एकदा या दोन्ही गोष्टी हातात आल्या की, कोणत्याही उद्योग-व्यवसायाची वाढ आणि विकास सहजशक्य होतो. पुढे जाऊन सरकारने कामगारविषयक प्रश्नांवर सामाजिक सुरक्षेचा मुद्दाही चर्चेत घेतला. पूर्वी प्रॉव्हिडंट फंडची संकल्पना होती. आता सरकारने सोशल सेक्युरिटी फंडची संकल्पना मांडली. ही संकल्पनाही कामगारांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणारी आहे. उदाहरणार्थ कोणत्याही कारणास्तव एखादा कामगार काम करू शकणार नसेल, तो अथवा ती दुसऱ्या क्षेत्रामध्ये कामाला लागले वा अकस्मात मृत्यूसारख्या घटना घडल्या तर अशा कोणत्याही बदलाच्या काळात त्यांना सोशल सेक्युरिटी फंडाची मोठी मदत मिळते. वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे येणारी अस्थिरता हाताळण्यास त्यांना आर्थिक हातभार मिळणे शक्य होते. त्यामुळे ही बाबही उल्लेखनीय म्हणायला हवी.

नवीन कामगार संहितेतील आणखी एक उत्तम बाब म्हणजे याने कामगारविषयक कायद्यांमधली क्लिष्टता कमी केली. पूर्वी कामगारविषयक तब्बल २९ कायदे होते. आता ते केवळ चार लेबर कोडमध्ये समाविष्ट करून घेतले गेले आहेत. या सगळ्यामागे कामगारांना कार्यस्थळी सुरक्षित आणि सुसह्य वातावरण देणे हाच विचार आहे. साहजिकच या नव्या आणि बदलत्या संकल्पनेत विकसित भारत, आत्मनिर्भर भारत, ईज ऑफ लिव्हिंग, ईज ऑफ डुईंग बिझनेस या सर्व धोरणांचा समावेश आहे. खेरीज 'मेहनतीचा सन्मान आणि समान अधिकार' हे तत्त्व प्रत्यक्षात येण्यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण करण्यास पुढाकार घेतलेला आहे. थोडक्यात सरकारने व्यक्त केलेल्या वरील ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यात कामगारविषयक प्रश्नांची उकल महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे या बदलत्या विचारांची आता कुठे ओळख झाली आहे. त्याच्या अंमलबजावणीला नुकतीच सुरुवात झाली आहे. स्वाभाविकच त्याचे परिणाम दिसण्यासाठी आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल. हा कायदा जुलै २०२२ चा असल्यामुळे आत्ता कुठे त्याला दोन वर्षांचा अवधी उलटला आहे. मात्र, नजिकच्या भविष्यात निश्चितच त्याचे लाभ अनुभवता येतील. कार्यस्थळातील सुरक्षा व्यवस्था, किमान वेतन, वेतन वेळेत मिळण्याची खात्री, सामाजिक सुरक्षा आदी पातळ्यांवर नियम कडक केल्यामुळे कामगारांच्या जीवनशैलीत आणि आर्थिक स्थितीत चांगले पडसाद बघायला मिळतील, याची खात्री वाटते. महत्त्वाचे म्हणजे नियम आणि कायद्यांमधील ही स्पष्टता कामगार आणि मालकांमधील संबंध चांगले ठेवण्यास मदत करेल. पूर्वी या दोन वर्गांमधले संबंध असमान होते, तणावाचे होते. मालकाचे कायमच वर्चस्व दिसून येत असे. कायद्यांमधील अस्पष्टतेचा फायदा या वर्गाला मिळायचा. मात्र, अलिकडच्या बदलत्या कामगार कायद्यांमुळे या दोहोंमधील नात्यालाही वेगळे परिणाम लाभले आहे, वेगळी दिशा मिळाली आहे, असे म्हणता येईल. कामगार कल्याणाच्या अनेक योजनांमुळे परिस्थितीत सुधारणा होताना दिसणार आहे. मुख्य म्हणजे कोणत्याही एका वर्गाचा विचार न करता कामगार आणि मालक या दोहोंचाही समान पातळीवर विचार केला गेल्यामुळे राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत असंतोष वा नाराजी असण्याची कारणे आता कमी होत आहेत. ही बाबही क्लिष्टता कमी होऊन परस्परांमधील संबंध सुधारण्यास कारणीभूत ठरेल.

कामगार संहितेमध्ये, कायद्यांमध्ये होणाऱ्या अशा सकारात्मक बदलांचा परिणाम कामगारांच्या कामावरही दिसून येईल. त्यांच्याकडून अधिक चोख, चांगले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून काम होईल. खेरीज या बदलांकडे केवळ कामगार संहिता म्हणून पाहून चालणार नाही. कारण याचाच एक एक पदर स्किल इंडिया, मेक इन इंडियामधील योजनांमध्ये दिसणार आहे. कौशल्य धारण केलेले आजचे अनेक कामगार पुढे उद्योजक होतील, स्वत:चे छोटे-मोठे व्यवसाय सुरू करतील. कामगार म्हणूनच कार्यरत राहणाऱ्यांना आपल्या सुखसुविधांमध्ये, आर्थिक प्रगतीमध्ये चांगले चित्र बघायला मिळेल. या सकारात्मक दृष्टिकोनातूनही आपण यंदाच्या कामगार दिनाकडे बघू शकतो. भारतामध्ये प्रचंड श्रमशक्ती असल्याचे कायमच बोलले जाते. याच बळामुळे अनेक परदेशी आस्थापने आपल्याकडे गुंतवणूक करण्यास येत आहेत. लवकरच ॲलन मस्क यांची 'टेस्ला' भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पातळीवरही आपल्याकडील कामगार कायद्यांमधील सुधारणा महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतील. कामगार कायदे योग्य नसल्यास परकीय गुंतवणूकदारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. परिणामी येणारी गुंतवणूक आणि त्यायोगे होणाऱ्या विकासाला खीळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र कामगारविषयक धोरणांमधील सुयोग्य बदल ही भीतीही दूर करतील.



### महत्त्वपूर्ण आव्हान

भारत हा विकसनशील देश आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात कामगारांना संरक्षण देणारे बरेच कायदे आणि त्यांचे न्यायालयीन निवाडे दिसले असले, तरी कामगार संघटनांच्या मागण्यांची आणि लढ्यांची व्याप्ती त्या त्या कारखान्यांपुरती मर्यादित होत गेली. त्यामुळे मालकवर्ग या चळवळीला वेसण घालण्यासाठी असंघटित क्षेत्रातील गरजूंना कामाला लावायचा आणि त्यासाठी कामगार कायद्यांच्या चौकटीला वळसा घालण्याच्या युक्त्या शोधायच्या तयारीला लागला. त्यांना कंत्राटीकरणाचे नवे साधन सापडले. मात्र, त्याला संघटित क्षेत्रातील कामगारांचा तितकाच संकुचित प्रतिसाद दिसतो. असे असले तरी, कामगार चळवळ एकूण लोकशाही चळवळीचा भाग आहे. तिचे स्वरूप आर्थिक भागीदारीएवढेच मर्यादित केले तर हा लढा भांडवल आणि श्रम यांच्या बाजारी गरजांपुरताच मर्यादित राहील. शिवाय तसे झाल्यास ती लढाई सामूहिकतेच्या चौकटीतून बाहेर काढून वैयक्तिक हिताच्या भांडवलशाही मूल्य चौकटीतच लढावी लागेल. त्यामुळे एकूण समाजाची रचना, त्यातील सामाजिक-आर्थिक न्यायाचे तत्त्व आणि भांडवलशाहीतून बाहेर पडून पुढील समाजाच्या उभारणीचे स्वप्न मूल्यात्मक पातळीवर आणणे हे कामगार चळवळीसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे.




# बंडखोरामुळे 'काका'च्या हॅटट्रिकचा मार्ग होणार सुकर?

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**सांगली, दि.३० एप्रिल-**

निवडणूकीच्या प्रचारापेक्षा महाविकास आघाडीत जागावाटपाबाबत गल्ली ते दिल्ली पर्यंतच्या चर्चा व वाद रंगलेल्या सांगली लोकसभा मतदारसंघातील तिरंगी लढतीने सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातू व काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांची बंडखोरी उद्धव ठाकरे गटाचे पर्यायाने महायुतीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्यासाठी अखेरपर्यंत डोकेदुखी ठरली आहे. महायुतीचे उमेदवार व भाजपाचे विद्यमान खासदार संजय काका पाटील यांचा त्यामुळे हॅट्रिकचा मार्ग सुकर झाला असल्याची चर्चा आहे विशाल पाटील यांची समजूत काढण्यासाठी राज्यातील नेत्यांपासून दिल्लीतील हाय कमांडपर्यंत झालेले प्रयत्न अयशस्वी ठरले. विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरल्याने महायुतीचे उमेदवार डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील निवडणुकीच्या आखाड्यात धोबीपछाड होतात का ?असा धोका निर्माण झाला आहे. जिल्ह्यातील काँग्रेसचे बहुतांश नेते चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात सक्रिय झाले असले तरीही दादा गटाला मानणारा वर्ग विशाल यांच्या समवेत आहे त्याचा फटका चंद्रहार यांना होणार आहे.

एकेकाळी सांगली लोकसभा म्हणजे काँग्रेस असे समिकरण होते. सांगली हा काँग्रेसचा अभेद्य गड.१९६२ पासून २००९ पर्यंत या मतदार संघातून काँग्रेसचाच उमेदवार विजयी झाला आहे. वसंतदादा पाटलांनी हा गड अभेद्य बनवला होता. त्यांच्यानंतर प्रकाशबापू , मदन पाटील, प्रतिक पाटील यांनी हा गड राखला होता. आणीबाणीच्या काळातही काँग्रेसचा उमेदवार सांगलीतून विजयी झाला होता. पण २०१४ च्या निवडणुकीत या गडाला तडा गेला. मोदी लाटेत राष्ट्रवादीतून भाजपात आलेले संजय काका पाटील प्रतीक पाटील





यांचा विरोधात मोठ्या मदत मताधिक्याने विजयी झाले.त्यानंतर सांगलीत काँग्रेसची एकएक बलस्थाने खालसा होत गेली. भाजपने त्यावर वर्चस्व मिळवले. आता या मतदार संघात तिरंगी लढत होत आहे. भाजप, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि अपक्ष विशाल पाटील यांच्यात बाजी कोण मारणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सांगली लोकसभेमध्ये सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. यात जत, तासगाव, खानापूर, पलूस, सांगली आणि मिरज समावेश होतो. त्या पैकी पलूस आणि जत विधानसभेत काँग्रेसचे आमदार आहेत.तर तासगाव राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे आहे. खानापूरमध्ये शिंदे गटाचे आमदार आहे. तर सांगली आणि मिरजमध्ये भाजपचे आमदार आहेत. त्यामुळे दोन आमदार काँग्रेस आणि भाजपचे आहेत. तर एक राष्ट्रवादी आणि एक शिवसेना शिंदे गटाचे आहेत. त्यामुळे विधानसभेनुसार विचार करता आघाडी आणि युती समसमान जागांवर आहे. याचा फायदा मात्र आता कोणाला होतो हे निवडणूक निकाल नंतर स्पष्ट होणार आहे.

भाजपने पुन्हा एकदा संजयकाका पाटील यांना उमेदवारी दिली आहे. मुळचे राष्ट्रवादीचे असलेले संजयकाका २०१४ला ऐन वेळी भाजपात आले आणि खासदार झाले. त्यांना पुन्हा एकदा मैदानात उतरवण्यात आले आहे. मोदी लाटेत संजयकाका विजयी झाली. २०१९ ला झालेल्या तिरंगी लढतीतही संजय काका यांचा फायदा झाला आणि ते विजयी झाले. यावेळी मात्र स्थिती वेगळी आहे. यावेळीही तिरंगी लढत होत असली तरी संजयकाका पाटील यांच्याबाबत अंतर्गत नाराजी असल्याची चर्चा आहे. स्वकीयांचा असलेला विरोध हीच मोठी दोघेदुखी संजयकाकां समोर आहे. असं असलं तरी विशाल पाटील यांच्या विरोधात काका आक्रमत झाले आहेत. पाटील घराण्याच सलग तिसऱ्यांदा पराभव करणार अशी शपथचं त्यांनी घेतली आहे.

### विशाल पाटील बाजी मारणार?

काँग्रेसकडून उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा विशाल पाटील यांना होती. त्यानुसार त्यांनी शेवटपर्यंत वाट पाहीली. अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला. काँग्रेसकडून एबी फॉर्म मिळेल यासाठीही प्रयत्न केले पण त्यात त्यांना यश आले नाही. दुसरीकडे प्रतिक पाटील यांनी प्रकाश आंबेडकर यांचीही भेट घेतली होती. अखेर ही जागा शिवसेनेकडेच गेले. त्याबाबत



**रणसंग्राम लोकसभेचा; लक्षवेधी लढत**

**सांगली मतदारसंघ**

जिल्ह्यातल्या काँग्रेस नेत्यांनी नाराजी ही व्यक्त केली. शिवाय विश्वजीत कदम यांनीही ती जाहीरपणे बोलून दाखवली. आता विशाल पाटील हे अपक्ष म्हणून मैदानात आहेत. ते अपक्ष म्हणून मैदानात असले तरी त्यांना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच साथ मिळणार आहे. त्यांची स्वत:ची ताकद मतदार संघात आहे. शिवाय कार्यकर्त्यांचे जाळेही आहे. सांगली लोकसभेतील दोन मतदार संघात काँग्रेसचे

**खासदार संजय काका पाटील यांच्या सकारात्मक बाजू**

- लोकसभेच्या दोन टर्म मध्ये केलेली विकास कामे
- विशाल पाटील यांच्या उमेदवारीमुळे महायुती विरोधातील मतांची विभागणी

**नकारात्मक बाजू**

- अँटी इन्कमबन्सीचा धोका
- भाजपा व महायुतीअंतर्गत गटबाजी

**चंद्रहार पाटील यांच्या सकारात्मक बाजू**

- स्थानिक स्वराज्य संस्थेतील काम
- माजी मंत्री व काँग्रेसचे नेते विश्वजीत कदम हे प्रचारात सक्रिय

**नकारात्मक बाजू**

- विशाल पाटील यांच्या बंडखोरीचा फटका
- विरोधकाची तगडी प्रचारयंत्रणा

**अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या सकारात्मक बाजू**

- वसंतदादा पाटील घराण्याचा वारसा
- आक्रमक वक्तृत्वशैली

**नकारात्मक बाजू**

- काँग्रेसच्या चिन्हाशिवाय दुसऱ्यांदा निवडणुकीत
- विश्वजीत कदम यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेते महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारात

आमदार आहेत ही पण त्यांच्या जमेची बाजू आहे. मागील निवडणुकीत वंचितच्या पडळकरांमुळे विशाल पाटील यांचे गणित बिघडले होते. ते यावेळी सुधारण्याचे काम विशाल पाटील यांनी हाती घेतले आहे. वसंतदादा घराण्यातील असल्याचा फायदाही विशाल यांना होऊ शकतो. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही सुरू केले आहेत.

### चंद्रहार यांचा टिकाव लागणार का?

महाविकास आघाडीत हा मतदार संघ शिवसेना ठाकरे गटाला गेला. कोल्हापूरच्या बदल्यात सांगली असे गणित शिवसेनेने मांडले. शिवाय परस्पर चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. तसं पाहाता या मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाची ताकद नाही. खानापूर आटपाडी मतदार संघात शिवसेनेचा एक आमदार होता. मात्र तेही शिंदेंबरोबर गेले. अशा स्थितीत ठाकरेंनीही ही जागा आपल्याकडे घेतली आहे. अशा वेळी काँग्रेस राष्ट्रवादीची मदत त्यांना होईल अशी त्यांची अपेक्षा आहे. मात्र विशाल पाटील यांच्या बंडखोरीमुळे शिवसेनेच्या चंद्रहार पाटलांचे गणित बिघडण्याची दाट शक्यता आहे. शेतकऱ्याचा मुलगा संसदेत जाणार असा प्रचार चंद्रहार पाटील करत आहेत. पण तो निवडणुकीच्या मैदानात विरोधकांना चितपट करण्यासाठी किती फायद्याचा ठरले याबाबत अनिश्चितता आहे.

### सांगली लोकसभेचे बलाबल काय?

सांगली लोकसभेमध्ये सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. यात जत, तासगाव, खानापूर, पलूस, सांगली आणि मिरज समावेश होतो. त्या पैकी पलूस आणि जत विधानसभेत काँग्रेसचे आमदार आहेत. तर तासगाव राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे आहे. खानापूरमध्ये शिंदे गटाचे आमदार आहे. तर सांगली आणि मिरजमध्ये भाजपचे आमदार आहेत. त्यामुळे दोन आमदार काँग्रेस आणि भाजपचे आहेत. तर एक राष्ट्रवादी आणि एक शिवसेना शिंदे गटाचे आहेत. त्यामुळे विधानसभा नुसार विचार करता आघाडी आणि युती समसमान जागांवर आहे. याचा फायदा मात्र आता कोणाला होतो? हे निवडणूक निकाला नंतर स्पष्ट होणार आहे.

यावेळी मात्र स्थिती वेगळी आहे. यावेळीही तिरंगी लढत होत असली तरी संजयकाका पाटील यांच्याबाबत अंतर्गत नाराजी आहे. त्यामुळे भाजपाचे जिल्हाध्यक्ष विलास जगताप यांनी पक्षाचा त्याकरिता पाटील यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. स्वकीयांचा असलेला विरोध हीच मोठी दोघेदुखी संजयकाकां समोर आहे. पाटील घराण्याच सलग तिसऱ्यांदा पराभव करणार, अशी शपथ त्यांनी घेतली आहे.

काँग्रेसकडून उमेदवारी मिळेल अशी, अपेक्षा विशाल पाटील यांना होती. त्यानुसार त्यांनी शेवटपर्यंत वाट पाहीली. अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला. काँग्रेसकडून एबी फॉर्म मिळेल यासाठीही प्रयत्न केले पण त्यात त्यांना यश आले नाही. दुसरीकडे प्रतिक पाटील यांनी प्रकाश आंबेडकर यांचीही भेट घेतली होती. अखेर ही जागा शिवसेनेकडेच गेले. त्याबाबत जिल्ह्यातल्या काँग्रेस नेत्यांनी नाराजी ही व्यक्त केली. शिवाय विश्वजीत कदम यांनीही ती जाहीरपणे बोलून दाखवली. आता विशाल पाटील हे अपक्ष म्हणून मैदानात आहेत. ते अपक्ष म्हणून मैदानात असले तरी त्यांना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच साथ मिळणार आहे. त्यांची स्वत:ची ताकद मतदार संघात आहे. शिवाय कार्यकर्त्यांचे जाळेही आहे.

सांगली लोकसभेतील दोन मतदार संघात काँग्रेसचे आमदार आहेत ही पण त्यांच्या जमेची बाजू आहे. मागील निवडणुकीत वंचितच्या पडळकरांमुळे विशाल पाटील यांचे गणित बिघडले होते. ते यावेळी सुधारण्याचे काम विशाल पाटील यांनी हाती घेतले आहे. वसंतदादा घराण्यातील असल्याचा फायदाही विशाल यांना होऊ शकतो. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही सुरू केले आहेत.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अग्रलेख...

# अतृप्त आत्म्यास सल्ला...

मराठा स्ट्राँगमॅन, जाणता राजा, लोकनेते, शाहू-फुले-आंबेडकरांचे वारसदार इत्यादी... राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना ही विशेषणे गेली पन्नासेक वर्षे लावली जात आहेत. या विशेषणांच्या यादीत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एकाची भर घातली आहे. ते विशेषण आहे 'अतृप्त किंवा भटकी आत्मा.' शरद पवार यांचा इतिहास आणि वर्तमान आणि त्यांच्या पक्षाची सद्यस्थिती पाहिली तर हे विशेषण पवारांना अगदी चपखल लागू पडावे. शरद पवारांची राजकीय कारकीर्द पाच दशकांहून अधिक काळाची. शाळकरी वयापासून त्यांना पुढारी होण्याची हौस होती. घरातले वातावरण तसे शेकापच्या जवळ जाणारे. पण, शरद पवारांनी राजकारण सुरू केले ते काँग्रेसच्या माध्यमातून. युवक काँग्रेसमध्ये त्यांनी संघटनेत मोठी पदे मिळविली आणि काँग्रेसच्या बड्या नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. १९६७ ते १९९० सालापर्यंत ते बारामतीचे आमदार म्हणून सतत निवडून येत राहिले. त्यानंतर ते केंद्र सरकारात गेले. केंद्रीय संरक्षण मंत्री, कृषी मंत्री झाले. त्यापूर्वी आणि त्यानंतर ते चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. हे सारे त्यांना काँग्रेसने दिले. पण, शरद पवार सुरुवातीपासून अतृप्त होते. यशवंतराव चव्हाणांचा राजकीय वारसदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले, पण ते त्यांच्याशीही एकनिष्ठ नव्हते. यशवंतराव चव्हाण यांच्यासोबतच वसंतदादा पाटील यांनाही शरद पवारांचे मार्गदर्शक समजले जायचे. पण, याच शरद पवारांनी वसंतदादांचे सरकार पाडले. महाराष्ट्राच्या राजकारणात पाठीत खुपसलेल्या खंजिराची कथा ज्यातून जन्माला आली, ती ही घटना. खंजिराचे कवित्व अद्याप संपलेले नाही. एकीकडे शरद पवार राजीव गांधी यांच्याशी निष्ठा दाखवत होते आणि त्याच वेळी चंद्रशेखर यांना पंतप्रधानपदी निवडण्यासाठी धडपडत होते, हेही दिल्लीवाल्यांनी त्या काळात अनुभवले, पाहिलेले आहे. शालिनीताई पाटलांनी शरद पवारांची तुलना सूर्याजी पिसाळ यांच्याशी केली होती, हेही लोक अद्याप विसरलेले नाहीत. शरद पवार बोलतात एक आणि करतात भलतेच, अशी त्यांची प्रतिमा यातूनच तयार झालेली आहे. राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीपासून ते गतवर्षी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याच्या नाटकापर्यंतचे सगळे अंक ही ढोंगबाजी होती आणि त्यामुळे महाराष्ट्रात व देशात शरद पवार हे नाव अविश्वासाचे समानार्थी ठरत आले आहे. त्यांच्या वेळोवेळच्या कलाकारीला त्यांच्या चाहत्यांनी राजकीय चतुराईची विशेषणे लावली. पण, त्यांच्या कलाकारीतून कधीही त्यांच्या खेरीज कुणाचेच भले झाले नाही. सतत अस्थिरता निर्माण होत राहिली. मुख्यमंत्री बदलत राहिले. सरकारे अस्थिर होत राहिली. ही पूर्णपणे अतृप्त व भटक्या आत्म्याचीच लक्षणे आहेत. आजवर तसे कुणी बोलत नव्हते. पण मोदींनी लोकभावनांना शब्द दिले एवढेच. शरद पवारांनी मूळ काँग्रेसशी घरोबा आणि घटस्फोट करण्याचा प्रयोग वारंवार केला. १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाला आव्हान देऊन त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना केली. त्यानंतर निवडणुका झाल्या आणि ज्या सोनिया काँग्रेसला काडीमोड देऊन पवारांनी स्वतंत्र राष्ट्रवादी पक्ष स्थापिला होता, त्याच पक्षाने काँग्रेसशी घरोबा करून महाराष्ट्रात सरकार स्थापन केले. त्यानंतर २००४ मध्ये त्याच सोनिया काँग्रेसप्रणीत संपुआच्या केंद्रीय सरकारात शरद पवार मंत्री बनले. कधी भाजपाला पाठिंबा, कधी शिवसेनेला समर्थन तर कधी नुसताच शाहू-फुले-आंबेडकरवादाचा धोशा. शरद पवार स्वतःला पुरोगामी म्हणवतात. त्यासाठीच त्यांनी भाजपाला सतत राजकीयदृष्ट्या अस्पृश्य ठरविले. शिवसेनेसोबतही ते तसेच वागले. पण, आता अशी स्थिती आहे की, त्यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्व प्रमुख लोक आणि संघटना भाजपासोबत आहेत. त्यांचे बंडखोर पुतणे अजित पवार महाराष्ट्रातील भाजपाप्रणीत महायुती सरकारात उपमुख्यमंत्री आहेत. ज्या शिवसेनेला त्यांनी परवापर्यंत नावे ठेवली, त्यांच्या मांडीला मांडी लावून राजकीय मांडवली करण्याचा प्रसंग शरद पवारांवर आलेला आहे, यालाही त्यांचे समर्थक पवारांची राजकीय लवचीकता वगैरे म्हणू शकतात. खरे तर ही नाचक्की आहे किंवा संधिसाधूपणा आहे. राजकारणातील संधिसाधूपणामुळेच शरद पवारांना त्यांची प्रासंगिकता आणि प्रभाव टिकवून ठेवता आला; मग कोणताही पक्ष सत्तेत असो. युती-आघाडीच्या राजकारणात ते माहीर आहेत, असे म्हणतात. पण, त्याची दुसरी बाजू अशी की, त्यांनी जशी युती-आघाडीची जोडजंतर सरकारे निर्माण केली, तशी अनेकांची सरकारे अस्थिर केली आणि पाडलीही. वसंतदादा पाटील, सुधाकरराव नाईक, विलासराव देशमुख यांच्यापासून ते अगदी आतापर्यंतच्या सर्व मुख्यमंत्र्यांच्या खुर्च्यांना येनकेनप्रकारेण हादरे देण्यात शरद पवारांनी मिळविलेला आसुरी आनंद त्यांच्या

अतृप्त आत्म्याच्या स्वभावाला साजेशा आहे. शरद पवार कोणत्या पक्षाचे आहेत, या प्रश्नाचे एकमेव उत्तर देता येत नाही. शरद पवार कोणत्या विचारांचे, याही प्रश्नाचे एकमेव उत्तर देता येत नाही. शरद पवार नेमके कुणाचे, याही प्रश्नावर बराच गूळ पाडला जाऊ शकतो. ते कुणाचेच नाहीत. असलेच तर ते स्वतःचे आणि सत्तेचे आहेत. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये युतीला कौल मिळालेला असताना मध्येच घुसखोरी करून महाविकास आघाडीचे सरकार आणले. पहाटेच्या शपथविधीचा उभयान्वयी प्रयोग हा तर त्यांचा 'मास्टर स्ट्रोक' होता म्हणतात. एकीकडे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत बसले तर दुसरीकडे शरद पवारांचे भाजपाच्या नेत्यांशी संधान बांधणे सुरू होते. शरद पवारांना विश्वासार्ह नेता वगळता बाकी काहीही म्हणता येते, या एका जुन्या जाणत्या नेत्याच्या वाक्याचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. काँग्रेसचे एक जुने प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी एका पत्रकार परिषदेनंतर खाजगीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रयोगाविषयी असे म्हटले होते की, स्वतःच्या शेतात उभे राहून भोवताली असलेल्या इतरांच्या शेतात पाईपलाईन टाकून ठेवण्याची पवारांची सवय जुनीच आहे. शरदरावांची राष्ट्रवादी काँग्रेस ही अशीच आणखी एक पाईपलाईन आहे. आता त्या वाक्याचा अर्थ शरद पवारांच्या कमालीच्या स्वार्थी राजकीय भूमिकांवरून प्रकर्षाने लक्षात येतो. राजकारणात डावपेच खेळावेच लागतात. पण, डावपेचातून राज्याचे-लोकांचे नुकसान होणार नाही, अस्थिरता निर्माण होणार नाही, याची काळजी समंजस राजकीय पुढारी घेत असतात. त्यांनी परिपक्वतेने वागणे अपेक्षितच आहे. पवारांनी गत काळात सातत्याने सरकारे अस्थिर करण्याखेरीज दुसरे काहीही केलेले नाही. शरद पवार लोककल्याणापेक्षा वैयक्तिक आणि राजकीय लाभाला प्राधान्य देतात. स्वतःच संकटसदृश स्थिती निर्माण करायची आणि मग पुढे येऊन काही तरी मार्ग काढल्यासारखे दाखवायचे, ही त्यांची जुनी खोड आहे. त्यातून त्यांची स्वतःची विश्वासार्हता रसातळाला गेली; शिवाय राजकीय खेळांबद्दल लोकांच्या मनात चीड निर्माण झालेली आहे. निष्ठा, विश्वास, बांधिलकी अशा शब्दांनी पवारांच्या शब्दकोशातून स्वतःच काढता पाय घ्यावा, इतके टोकाचे विसंगत वर्तन पवारांनी वारंवार दाखविले आहे. आता त्यांच्या पक्षाचे सरकार महाराष्ट्रात किंवा देशात नाही. इतक्यात ते येण्याचीही शक्यता नाही. त्यांना आता आणखी सवड मिळेल. या रिकामपणाच्या काळात काडेलपणा करण्याऐवजी स्वतःच्या शब्दकोशातून बाहेर पडलेल्या शब्दांच्या रिकाम्या जागांवर त्यांनी जरा चिंतन केले तर त्यांचाच फायदा आहे. अतृप्त आत्म्यासाठी हा फुकटचा सल्ला आहे.

## प्रासंगिक

# 'कळे न हा चेहरा कुणाचा?'

**राहुल गोखले**

'इंडिया आघाडी सत्तेत आली तर पाच वर्षांत पाच पंतप्रधान होतील आणि देश असा चालू शकत नाही,' असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. याचे कारण स्पष्ट आहे आणि ते म्हणजे मोदींच्या विरोधात इंडिया आघाडीचा चेहरा कोण? याचा अद्याप न झालेला उलगडा. वास्तविक, या आघाडीच्या बैठका गेल्या वर्षीपासून सुरू होत्या आणि भाजपा विरोधकांची आघाडी निश्चित होईल, अशा आणाभाका घेतल्या जात होत्या. मात्र, भूतकाळात अशा आघाड्यांचे जे प्राक्तन तेच यावेळीही कायम राहिले. ते म्हणजे प्रारंभीचा उत्साह आणि नंतरचे मतभेद. नितीश कुमार, ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीला सोडचिठ्ठी दिली. पैकी नितीश यांनी भाजपाशी हातमिळवणी केली. त्यामुळे ते इंडिया आघाडीचा नेतृत्वपदाचा चेहरा असतील, याची शक्यता संपुष्टात आली. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे नाव इंडिया आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून सुचविले आणि नंतर लगेचच त्या आघाडीतून बाहेर पडल्या; कारण पश्चिम बंगालमध्ये त्यांच्या तृणमूल काँग्रेसची लढत भाजपाप्रमाणे काँग्रेस-डाव्यांशीदेखील आहे. शिवाय खडगे यांनीदेखील अगोदर निवडणूक; नंतर नेतेपदाची चर्चा अशी भूमिका घेतल्याने तो मुद्दा तेथेच बासनात बांधण्यात आला. द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे गट), समाजवादी पक्ष यांच्याशी त्या त्या राज्यांत काँग्रेसने जागावाटपाचा समझोता केला आहे, हे खरे; पण त्या पक्षांच्या नेत्यांना राष्ट्रीय राजकारणात ना स्वारस्य ना त्यांचा तसा अनुभव; ना त्यांच्या पक्षाची तशी व्याप्ती ना त्यांना तसे जनसमर्थन. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव हे लोकसभेची निवडणूक लढवत असले, तरी ते काही पंतप्रधानपदाचे उमेदवार असू शकत नाहीत. या सगळ्या पृष्ठभूमीवर मोदी यांनी इंडिया आघाडीत सर्वोच्च पदावरून असलेला संभ्रम अधोरेखित केला आहे. त्यावर आघाडीकडे पंतप्रधानपदाचे अनेक चेहरे आहेत, असे थातूरमातूर उत्तर देऊन वेळ मारून नेता येत असली, तरी त्याने वास्तविकता बदलत नाही.

२००४ साली केंद्रातील भाजपा सरकारला पायउतार व्हावे लागल्यानंतर सत्तेत आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचे नेतृत्व सोनिया गांधी करणार हे गृहीतच धरले जात असताना त्यांनी नकार दिला आणि ती धुरा डॉ. मनमोहन सिंग यांना सोपविण्यात आली. डॉ. सिंग यांच्या नेतृत्वाखाली २००९ ची लोकसभा निवडणूक संयुक्त पुरोगामी आघाडीने जिंकली; त्यामुळे निवडणुकीपूर्वी पंतप्रधानपदाचा चेहरा ठरविणे तितकेसे महत्त्वाचे नाही, असा युक्तिवाद कदाचित करण्यात येईल. काही अंशी त्यात तथ्य; त्याबरोबरच हेही खरे की, २००४ किंवा २००९ आणि २०२४ मधील राजकीय नेपथ्यात मोठी तफावत आहे. १९९८ पासून केंद्रात भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत असले, तरी ते एकपक्षीय सरकार नव्हते. सुमारे २०-२५ पक्षांचा सहभाग असणारे ते आघाडी सरकार होते. त्याचे नेतृत्व अटलबिहारी वाजपेयी करीत असले, तरी ते काही भाजपा सरकार नव्हते. १९९९ सालच्या निवडणुका राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जिंकल्या त्या वाजपेयी यांच्या चेहऱ्यामुळेच. १९९९ सालीच लोकसभेत विश्वासदर्शक ठरावात त्यांच्या सरकारचा अवघ्या एका मताच्या अंतराने पराभव झाला होता. तेव्हा वाजपेयी यांना ती सहानुभूती मिळाली होती. मात्र, तो सर्व काळ हा आघाडी सरकारांचा होता. एकपक्षीय सरकार सत्तेत येणार नाही अशीच जेव्हा स्थिती असते तेव्हा निवडणुकीनंतर सरकारच्या प्रमुखपदाचा चेहरा ठरविला जाण्यात मतदारांना फारसे आक्षेपार्ह वाटत नाही. तथापि, आता ती स्थिती बदललेली आहे.वाजपेयी यांच्यासारखा लोकप्रिय व सर्वमान्य नेता सरकारचे नेतृत्व करीत असला, तरी आपल्या पक्षाची धोरणे पूर्णार्थाने राबविण्यात त्यांना मर्यादा होत्या. नंतर सत्तेत आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये काँग्रेसला डाव्यांसह अन्य पक्षांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या होत्या, हे सर्वश्रुत आहे. यातून धोरणांच्या अंमलबजावणीचा होणारा खेळखंडोबा देशाच्या वाटचालीला खीळ घालणारा असतो, असाही अनुभव मतदारांनी घेतला आहे. त्यामुळे शक्यतो एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत देण्याकडे मतदारांचा आता कल असतो. आणि म्हणूनच त्या पक्षाची धोरणे प्रभावीपणे राबविण्यासाठी नेत्याचा आश्वासक चेहरा आवश्यक ठरू लागला आहे. हे केवळ लोकसभेच्या निवडणुकांनाच लागू आहे, असे नाही तर विधानसभांच्या निवडणुकांनादेखील लागू आहे. २०१४ नंतर केंद्रातच नव्हे तर अनेक राज्यांत असेच एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याचा काळ सुरू झाला. साहजिकच नेतृत्वाचा चेहरा कोण हा मुद्दा कळीचा बनला. तथापि, विरोधकांची शोकांतिका ही की, गेल्या १० वर्षांत भाजपा विरोधकांना मोदींना आव्हान देऊ शकेल असा एकही चेहरा शोधता आलेला नाही. इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत आले तर त्यांचा नेता कोण हा प्रश्न निवडणुकीनंतर सोडविता येईल इतका सोपा नाही; तसा तो असता तर अगोदरच इंडिया आघाडीने नेतृत्वाचा चेहरा ठरवून टाकला असता. आघाडीतील सर्वच पक्ष कमी-अधिक प्रमाणावर तितक्याच जागा जिंकलेले असतील तर त्यातील कोणत्या पक्षाच्या नेत्याला अन्य पक्षांच्या तुल्यबळ नेत्यांनी मान्यता द्यावी यावर तोडगा निघणे दुरापास्त.

अडथळ्यांची ही शर्यत टाळायची तर आघाडीत एक पक्ष मोठा असावा लागतो आणि तोही इतका मोठा की, आघाडीत दुसऱ्या स्थानावर असणाऱ्या पक्षाला अव्वल पक्षाशी सहजासहजी स्पर्धा करता येऊ नये. इंडिया आघाडीतील स्थिती तशी दिसत नाही. मुळात एकपक्षीय सरकारने येणारी राजकीय स्थिरता सोडून आघाडी सरकारला सत्तेत आणून अस्थिरतेला निमंत्रण द्यायचे का, याचा विचार मतदार केल्यावाचून राहणार नाहीत. त्यातही आघाडीचा सर्वमान्य नेता कोण हे गुलदस्त्यात. काँग्रेसला ते नेतृत्व मिळेल असे म्हणावे तर २०१४ आणि २०१९ मधील लोकसभा निवडणुकांत काँग्रेसच्या दारुण पराभवाचे स्मरण झाल्याखेरीज राहत नाही. शिवाय सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खडगे हे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात नाहीत. राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढविली असली, तरी पक्षाचे ते अध्यक्ष नाहीत. ती जबाबदारी टाळणाऱ्या राहुल यांनी पंतप्रधानपदाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहावे हे हास्यास्पद. गांधी कुटुंबीयातील कोणी चेहरा नसेल तर पक्षाला अन्य नेत्याचा शोध घ्यावा लागेल. कोणता नेता आघाडीतील अन्य पक्षांना मान्य होईल, या अगोदर प्रश्न, कोणता काँग्रेस नेता पक्षांतर्गत सर्वमान्य ठरेल, हाही आहे आणि तो क्लिष्ट आहे.

'निवडणूक म्हणजे सौंदर्य स्पर्धा नव्हे!' अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी दिली आहे. 'इंदिरा इज इंडिया' असा नारा देणाऱ्या आणि इंदिरा गांधींच्या हत्येनंतर पंतप्रधानपदाची धुरा रातोरात राजीव गांधी यांच्याकडे सोपविणाऱ्या पक्षाच्या नेत्याने असे शेलके विधान करावे, हा निव्वळ दुटप्पीपणा. शिवाय रमेश म्हणतात हे खरे असेल तर राहुल हेच पंतप्रधानपदाचा चेहरा आहेत, असे पटोले यांनी जाहीर करण्याचा अर्थ काय? एकूण सावळा गोंधळ आहे. नेता ठरविता येत नाही ही अडचण मान्य न करता त्या मुद्द्याला बगल देण्यात तात्पुरता दिलासा शोधण्यात हे पक्ष धन्यता मानत आहेत, इतकाच या सर्व सव्यापसव्याचा अर्थ. सुरेश भटांनी वेगळ्या संदर्भात लिहिलेल्या पंक्ती 'नेता कोण?' या निर्णयाच्या बाबतीत आघाडीच्या चालढकलीला आणि संभ्रमाला चपखल लागू पडतात... 'कळे न हा चेहरा कुणाचा?'

९८२२८२८८१९

## वेध

# झाले 'इलेक्शन', जपा 'रिलेशन'!

**विजय निचकवडे**

निवडणुकीपर्यंत हातात हात घेऊन जाणारे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहजतेने सहभागी होणारे निवडणुकीनंतर मात्र काहीसे दुरावल्यागत दिसत आहेत. निवडणुकीच्या काळात प्रचाराच्या निमित्ताने एकमेकांचे वाभाडे काढणारे नेते नंतर मात्र गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. याच नेत्यांसाठी जिवाचे रान करणारे कार्यकर्ते मात्र आपापसांत वैर घेऊन बसतात. निवडणुकीमुळे भाऊबंदकी आणि मैत्रीत येणारे वितुष्ट कुणासाठी, याचा विचार करून संबंध जपण्याची वेळ आली आहे. 'नेत्यांचे झाले भले, कार्यकर्ते आपसात लढे' हे होण्यापेक्षा 'झाले इलेक्शन, जपा रिलेशन' या सूत्राचा अवलंब झाल्यास जिवाला जीव देणारा माणूस कधीच दुरावणार नाही.

राजकारणाची नशा भल्याभल्यांना वेड लावणारी आहे. ज्यांच्यासाठी राजकारण केले जाते, ते या नशेतही स्वतःला सजग ठेवतात. म्हणूनच तर केवळ राजकीय विरोधापुरता त्यांचा विरोध असतो. एरवी एकमेकांचे कट्टर विरोधकही एकाच पंगतीत बसून हसत-खेळत जेवताना दिसतात. यावेळी कुठेही त्यांच्या चेहऱ्यावर द्वेष किंवा राग दिसत नाही. मात्र, नेत्यांचे हे गुण नेत्यासाठी झगडणारा सामान्य कार्यकर्ता अजूनही अवगत करू शकला नाही. म्हणूनच निवडणूक झाली की कधीकाळी एकमेकांचे जिवलग असलेलेही कट्टर वैरी झाल्याचे अनुभवास येते. हे वैर कुणासाठी याचा जराही विचार त्या सामान्य आणि निरागस कार्यकर्त्याच्या मनाला शिवत नाही. आपल्या नेत्यासाठी तो कुठल्याही स्तराला जायला तयार असतो. व्यासपीठावरून नेत्याने एखाद्याची उणीदुणी



काढली की कार्यकर्ता त्याचीच 'री' ओढीत चालत राहतो. हा आवेश इतका असतो की, एकमेकांच्या अंगावरही कार्यकर्ते चालून जाण्यास मागेपुढे पाहात नाहीत. त्यातून साध्य काय होणार, याची जराही गोळाबेरीज त्यांच्या जवळ नसते. निवडणूक काळात नेते एकमेकांची लायकी काढून मोकळे होतात; मात्र नंतर कायम संबंध जपण्याची कला त्यांना अवगत असते. म्हणूनच कट्टर विरोधकही निवडणुकीनंतर एकमेकांशी गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात.

नेत्यांची हे गुण आमचा कार्यकर्ता अजूनही घेऊ शकला नाही. निवडणुकीने घराघरांत वितुष्ट आल्याची अनेक उदाहरणे आहेत. एकाच घरातील दोन वेगवेगळ्या पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकर्ते एकमेकांच्या घराचा उंबरठा ओलांडतानाही विचार करतात. कधीकाळी जिवलग असलेले मित्र निवडणुकीनंतर एकमेकांच्या तोंडावर तोंड पडणार नाही, याची काळजी घेतात. सुख-दुःखात सहभागी होतानाही या दोघांमध्ये आड येते, ते निवडणूक काळातील नेत्यासाठी एकमेकांच्या विरोधात पुकारलेले बंड. निवडणूक नेत्यांची होते, पण दोस्तीत दुरावे आणि गल्लीत दुफळ्या निर्माण होतात. याचा कधी कोणी विचार केला आहे का?

जय-पराजय लागलेच आहे, पण यासाठी आपण आपल्या वर्षानुवर्षांच्या नात्यांना पराभूत करायचे काय? याचा विचार व्हायलाच पाहिजे. कुणाचा नातेवाईक कुण्या एका पक्षातून निवडणूक लढवीत असताना, तो ज्या पक्षात आहे, त्या पक्षावरील त्याच्या निष्ठेबद्दल शंका घेणे कितपत योग्य आहे? निवडणूक ही विचारांची भिन्नता म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. व्यक्तिगत विरोध या नजरेतून निवडणुकीकडे पाहिले गेल्यास मैत्री आणि रक्ताच्या नात्यांवर निवडणुकीनंतर संकट आल्याशिवाय राहणार नाही. नेत्यांच्या निवडणुका सध्या संपल्या आहेत. वरिष्ठ पातळीवर त्यांच्या भेटीसाठी आणि गुण्यागोविंदाने नांदणे सुरू झाले आहे. पण निवडणुकीची ती धग अजूनही ग्रामीण भागात कार्यकर्त्यांमध्ये जाणवते. निवडणूक काळात जे काही झाले, त्याचा राग अजूनही अनेकांच्या मनात घर करून बसला आहे. घरे दुरावली आहेत तर चांगल्या मित्रांची मैत्री बाधित झाली आहे. त्यामुळे आता गुलाल कुणाचाही असो, माणसं आपली आहेत, या भावनेतून विचार होणे गरजेचे आहे. 'इलेक्शन' संपले; आता खरी कसोटी 'रिलेशन' जपण्याची आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने निवडणूक काळात घातलेला पक्षाचा चष्मा बाहेर काढून आधी सारखेच वागणे सुरू केल्यास दुखावलेली मने आणि दुरावलेले मित्र नक्कीच जवळ येतील, यात शंका नाही. ज्या नेत्यांसाठी आपण लढतो, त्या नेत्यांकडून किमान हा गुण तरी कार्यकर्त्यांनी घ्यायला पाहिजे. समाज माध्यमांवर अनेक संदेश फिरत असतात. मात्र, हा संदेश नक्कीच समाजमन जपणारा असाच म्हणता येईल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# कन्यादान म्हणजे गोत्रप्रदान!

**प्रा. दिलीप जोशी**

हा विषय घेण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत पत्रकार असलेले माझे एक मित्र मला भेटायला आले. गप्पागप्पात कन्यादानावर विषय आला. ते म्हणाले, ''कन्या जर दानात द्यायची वस्तू असेल तर मी कन्यादान न करता नोंदणीकृत विवाह करेल.'' त्यांच्याशी कन्यादानावर मी शास्त्रीय चर्चा केल्यावर त्यांचे मतपरिवर्तन झाले. भारतीय कुटुंब पद्धती जगात सर्वश्रेष्ठ असून जीवनात सुख आणि शांतीचा मार्गसोपान म्हणजे भारतीय कुटुंब व्यवस्था आहे. म्हणूनच 'धन्यो गृहस्थाश्रमः' म्हटले जाते. अशांत जगात शांतीचा मार्ग म्हणून आपल्या भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास होत आहे.

एकीकडे वर्षभर लग्न टिकले म्हणून लग्नाचा वाढदिवस (वेडिंग ॲनिव्हर्सरी) साजरे करणारी पाश्चात्त्य संस्कृती कुठे अन् साता जन्माच्या गाठी मानणारी आपली भारतीय संस्कृती कुठे? विवाह हे कंत्राट मानणारी विदेशी भावना आणि विवाह हा संस्कार मानणारी हिंदू संस्कृती यांच्यात तुलना होणे अशक्यच. स्त्रीला उपभोग्य वस्तू मानणारे तिकडे तर 'धर्मेच, अर्थेच, कामेच नातिचरामि' असा संकल्प, प्रतिज्ञा आणि शपथ घेणारी आणि स्त्रीला उच्च दर्जा देणारी आपली पवित्र संस्कृती इकडे आहे. आपल्याकडे विवाह हा संस्कार असून लग्नबंधन म्हणजे 'हृदया हृदय एक जाहले' हा भाव आहे. लग्न म्हणजे दोन जिवांचे मिलन, दोन कुटुंबाचे मिलन, दोन गोत्रांचा संगम. विवाह प्रक्रियेत मुलगा मुलगी एकमेकांना पाहतात, दोघांचीही पसंती विचारली जाते, दोघांनीही एकमेकांना पसंती दिली तर घराणी अभ्यासली जातात. वाङ्निश्चय, सिमांतपूजन इत्यादी प्रक्रियेतून नियोजनबद्ध असा विवाह सोहळा साकारला जातो.

लग्नसंस्कारात अत्यंत भावपूर्ण, तितकाच महत्त्वाचा आणि अग्नीच्या साक्षीने केला जाणारा विधी म्हणजे 'कन्यादान' विधी होय.

'कन्यादान' या शब्दावर बरीच उलटसुलट चर्चा नेहमीच होत असते. कन्या काय वस्तू आहे का म्हणून तिचे दान होते? वगैरे वगैरे बाबींवर वादसंवाद होतात. खरं म्हणजे या विधीला 'कन्यादान' हा शब्द वापरणे शास्त्रसंमत नाही; पण तो रूढ झालेला प्रचलित शब्द आहे. 'कन्यादान' हा शब्द रूढ का झाला असावा? तर, कन्या म्हणजे बापाच्या काळजाचा तुकडा, मायबापाची अंगक, जीवीची जिवलग. तळहातावरच्या फोडाप्रमाणे, आत्यंतिक प्रेमाने लालनपालन, शिक्षण, संस्कार करत जिवापाड जपायचं आणि ही मुलगी वयात आली की, हा काळजाचा तुकडा परक्या घरी पाठवायचा. यातील मनोसंवेदना फक्त मायबापच अनुभवतात. मायबाप सोडून ती अनुभूती इतरांना शक्य नाही.



महाकवी कालिदासांनी 'अभिज्ञान शाकुंतला'त जेव्हा शकुंतला सासरी जाते तेव्हाची काण्व महामुनींची भावावस्था वर्णन केली.

*यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संसपृष्टमुत्कण्ठया,*
*कण्ठः स्तम्भितवाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडंदर्शनम् ।*
*वैक्लव्यं मम तावदीदृशमिदं स्नेहादरण्योकसः,*
*पीड्यन्ते गृहिणः कथं न तनयाविश्लेषदुःखैनवैः ॥*

शकुंतला ही काण्व महामुनींची मानस कन्या. काण्वमुनी संन्यस्त आणि आश्रमवासी. असे असूनही शकुंतलेच्या सासरी जाण्याने योगी असलेले काण्व ऋषी सख्ख्या नाही तर मानलेल्या कन्येसाठी विव्हळ झाले. ते संन्यासी असून भावविभोर होतात तर सामान्य संसारी मायबापांच्या अवस्थेची कल्पना न केलेलीच बरी.

या भावविव्हळ अवस्थेत काण्व महामुनींच्या तोंडी शब्द येतात-

*अर्थो हि कन्या परकीय एव । तामद्य सम्प्रेष्य परिग्रहीतुः ।*
*जातो ममायं विशदः प्रकामं । प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥*

मुलगी काळजाचा तुकडा असला तरी तिचे लग्न झाल्यावर तिच्या बापाला हलके वाटते. आपल्याकडे जबाबदारीतून मुक्त झालो म्हणण्याचा प्रघात आहे. ही वस्तुस्थिती आहे.

'दिल्या घरी तु सुखी राहा' हा भाव मनात असतोच. हेच आपण मंगलाष्टक म्हणताना 'कन्या हे परकीय वित्त म्हणूनी, निर्व्याज सांभाळीले' म्हणतो. याचा अर्थ कन्या ही दानवस्तू होत नाही तर ते परकोटीचे प्रेम आहे. व्यवहारातही आपण नेहमीच म्हणतो, 'पैसा नाही कमावला मी! पण मुले पायावर उभी केलीत. माझी मुलेच माझी संपत्ती!' इथे मुले म्हणजे धन, संपत्ती नसून तो स्वाभिमान आहे.

बरं! कन्या आहे म्हणून तिला अधिकार नाही, असे आपल्या भारतात मुळीच नव्हते. उलट भारतीय संस्कृतीत अनेक स्वयंवर कथा आपल्याला माहीत आहेत. स्वयंवरामध्ये वर निवडीचा अधिकारच उपवर कन्येला दिलेला आहे. यात कन्या आलेल्या वरापैकी आपल्या पसंतीच्या एकाच्या गळ्यात वरमाला घालायची. याचा अर्थ बाकीच्यांना ती नकार द्यायची. तिचा नकाराधिकार अबाधित असायचा. यावरून हेच सिद्ध होते की, कन्या पूर्णाधिकारी असायची. त्यामुळे ती दानाची वस्तू कधीच नव्हती. उलट वर पसंतीत पूर्वापार तिचे पूर्ण मत घेतले जात होते. आताही मुलीची पसंती नसेल तर विवाह पुढे सरकत नाही. म्हणून 'कन्यादान' हा शब्दशः अर्थ घेणे योग्य नसून त्यातील गर्भितार्थ आणि रुढार्थ समजून घेतला पाहिजे. 'कन्यादान' हा शब्द रुढार्थ असेल तर मूळ शब्द कोणता? हा प्रश्न साहजिक आहे. हिंदू धर्मात कन्यादान हा विवाहातील विधी आहे. कन्यादान हा रूढार्थाने वापरला गेलेला आणि वारंवारितेमुळे प्रचलित झालेला शब्द असून शास्त्रात त्याला 'गोत्रदान' म्हणतात. कन्यादान ही दानाच्या पेक्षाही अधिक उच्च कृती म्हणून या विधीला गोत्रप्रदान विधी म्हटले आहे. दानात अपेक्षा असतात, पण प्रदान निरपेक्ष असते. म्हणून गोत्रप्रदान अत्युत्तम. ते आपण समजून घेऊ.

मुलगी ज्या कुळात जन्माला आली ते तिचे जन्म कुळ. त्या कुळाचे जे गोत्र तेच मुलीचेही जन्मगोत्र. जन्म होताच वडिलांचे गोत्र तिला प्राप्त होते; अर्थातच हेच तिचे जन्मजात गोत्र. वयात येईपर्यंत ती याचं गोत्रात लहानाची मोठी होते. आपल्या वडील कुलात वाढता वाढता वयात आल्यावर तिचा विवाह करणे क्रमप्राप्त होते. मुळातच हिंदू संस्कृतीत स्त्री ही माता, शक्ती स्वरूपा आणि पूजनीय मानली आहे. आपली संस्कृती शिवशक्ती ऐक्यावर आधारित आहे. शक्तीशिवाय शिव नाही आणि शिवाशिवाय शक्ती नाही. त्यामुळे कन्येला वस्तू संबोधणे शक्यच नाही. ती कुटुंबाचा मूलाधार आहे. थोडक्यात वारंवारितेमुळे रूढ झालेला शब्द कन्यादान असला, तरी ते गोत्रदान आहे.

९८२२२६२७३५

### लाटबीट काहीही नाही

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांत फूट पडली आणि दोघांच्याही बाबतीत पक्षाचे नाव व पक्षचिन्हही गेले त्याबद्दल त्यांच्या बाबतीत राज्यात सहानुभूतीची लाट असल्याची 'टेबलकुक्ड' बातमी काही दिवसांपूर्वी काही पत्रकारांनी दिली. २८ एप्रिल रोजी छगन भुजबळ यांनी तशाच आशयाचे मात्र संदिग्ध विधान केल्याची बातमी पसरविण्यात आली. प्रत्यक्षात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याबद्दल सहानुभूतीची लाटबीट काहीही नसून तिरस्काराचीच लाट आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी तत्कालीन शिवसेना आणि भाजपा यांची निवडणूकपूर्व युती होती. त्यावेळी हिंदुत्वप्रेमी मतदारांनी युतीला स्पष्ट बहुमत दिले होते. मात्र, उद्धव ठाकरे यांनी युतीचा धर्म न पाळता, मुख्यमंत्रिपदाचे आमिष दाखवताच पलटी मारली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सरकार स्थापन करून हिंदुत्वप्रेमी मतदारांचा विश्वासघात केला. साखरपुडा एकाशी करून लग्न दुसऱ्याशी करण्याचा व्यभिचार केला. त्यांनी आदित्य ठाकरेंना



सोबत घेऊन १०, जनपथ येथे जाऊन सोनिया गांधींपुढे मुजरा केला, ते पाहून बाळासाहेबांनी स्वर्गात अश्रू ढाळले असतील. त्यांच्या गुरूंनी दुसऱ्यांचे पक्ष आणि घरे फोडण्याचेच काम केले, त्यांना नियतीने काव्यगत न्याय- पोएटिक जस्टिस दिला. तेव्हा त्या दोघांबद्दल सहानुभूतीची लाटबीट काहीही नसून तिरस्काराचीच लाट आहे आणि त्याचे प्रत्यंतर ४ जून रोजी येणारच आहे.

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

## वाचक पत्रे

### एक मत वाया गेलं...

नुकत्याच एका कार्यक्रमात कलाकार संकर्षण कऱ्हाडे यांनी एका सामान्य नागरिकाच्या मनात खदखदणाऱ्या विचारांची कविता सादर केली. जनसामान्यांच्या मनाला भावणारी अशी ती कविता राजकीय नेत्यांच्या हृदयाला भिडली, हे त्यांना फोनवरून आणि प्रत्यक्ष भेटीतून भेटलेल्या राजकीय मंडळींच्या संभाषणातून समजून गेले. खरोखरीच जे काही सध्या राजकारणात चालू आहे त्याची ही वैचारिक चित्रफीत होती. एकाच कुटुंबातली वेगवेगळ्या पक्षांची मंडळी हा राजकीय तमाशा पाहून गांगरून गेली आहे, याचे हे सुंदर समीकरण कऱ्हाडे यांनी एखाद्या गणितातील प्रमेयाप्रमाणे जनताजनार्दन आणि पुढारी यांच्या पुढे सोडविण्याचा उत्तम प्रयास केला आहे, त्याबद्दल त्यांना खूप खूप धन्यवाद. तरीही या लोकशाही उत्सवात आपल्या मताची किंमत कोणीही वाया घालवू नये, ही कळकळीची विनंती. शेवटी नोटा हा पर्याय उपलब्ध आहेच. 'ज्यांच्या विरोधात मत दिले त्यांच्याच हाती कमळ आले, पण तळमळ होती मतदानाची म्हणून मत दिले, पण मनापासून ते वाया गेले' हे सांगण्याची लकब संकर्षण यांनी दाखवून 'नेत्यांनो कितीही बदललेत पक्ष तरी आमचे आहे तुमच्याकडे लक्ष' हेही ठणकावले. म्हणूनच नेते आणि जनता दोघांनीही सावध राहूनच आपला हक्क सिद्ध करावा; जेणेकरून मत वाया गेले, असे म्हणण्याची वेळ कोणीही आणू न देता हा लोकशाही उत्सव आनंदाने साजरा करावा आणि रंगमंचाच्या कलाकारीकेतून अशीच काव्ये सादर व्हावीत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### दुष्काळाचे सावट

दिवसेंदिवस राज्यावरील दुष्काळाचे सावट गडद होत चालले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच; पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. विशेषतः मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहेत. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांत अल्प पाणी साठा शिल्लक आहे. राज्यातील पाण्याची पातळीही कमालीची खालावली आहे. एका एका हंड्यासाठी नागरिकांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. 'टँकरमुक्त महाराष्ट्र' ही संकल्पना अजूनही साध्य झालेली नाही. ते अजूनही स्वप्नच आहे. राज्यात टँकर चालूच आहेत. ग्रामीण भागासह शहरी भागातही टँकरची मागणी वाढली आहे. पिण्याच्या पाण्याची ही अवस्था असेल तर शेतीच्या पाण्याचे काय? पाण्याअभावी खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील निवडणुका संपल्यावर आचारसंहिता शिथिल करून दुष्काळी कामे हाती घ्यायला हवीत. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रालाच दिलासा मिळेल, असे काम प्रशासनाने करायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### अॅड. प्रकाश आंबेडकर यांची गुरूवारी सोलापुरात जाहीर सभा

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

वंचित बहुजन आघाडी पक्षाचे राष्ट्रीय नेते अॅड. प्रकाश आंबेडकर हे गुरुवारी सोलापुरात आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आतिश बनसोडे यांना वंचित बहुजन आघाडीने पुरस्कृत उमेदवार केले आहे. त्यांच्या प्रचारार्थ प्रकाश आंबेडकर हे गुरुवारी सोलापुरात येत आहेत. प्रकाश आंबेडकर यांची शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील कुंभार वेस इथल्या जय भवानी प्रशालेच्या मैदानावर दुपारी तीन वाजता सभा होणार आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी वंचित बहुजन आघाडीने राहुल गायकवाड यांना अधिकृत उमेदवारी दिली होती. परंतु गायकवाड यांनी अचानक आपली उमेदवारी मागे घेतली आणि काँग्रेसला पाठिंबा देत राहुल गांधी यांच्या सभेत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीने अपक्ष आतिश बनसोडे यांना पाठिंबा दिला आहे. यामुळे आतिश बनसोडे यांच्या प्रचारासाठी अॅड. प्रकाश आंबेडकर यांची सभा ठेवण्यात आली आहे. तरी सोलापूरच्या नागरिकांनी या सभेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.



### व्हिक्टर युथ फेडरेशनतर्फे मुस्लीम सामुदायिक विवाह;१५ मेपर्यंत नाव नोंदणी

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

व्हिक्टर युथ फेडरेशच्या वतीने गेल्या १८ वर्षा पासून मुस्लीम समाजाचे सामुदायिक विवाहचे आयोजन केले जाते . यंदा ही ५० जोडप्यांचे निकाह लावण्याचा मानस आहे. सामुदायिक विवाह पानगल प्रशालेत २९ मे २०२४ बुधवार रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून यात शामील होण्यासाठी १५ मे २०२४ पर्यंत आपले नांवे जरूरी कागद पत्रासह नोंदविणे बंधनकारक आहे. यात समिल होणाऱ्या जोडप्यांकडून रु पांच हजार नोंदणी फी ठेवण्यात आली आहे यात वधुवरांना शानदार कपडे, हार, कपाट पलंग सह इतर संसार उपयोगी सामान देण्यात येईल तसेच दोन्ही पक्षा कडचे शंभर लोकांना जेवण्याची व्यवस्था करण्यात येईल. या सामुदायिक विवाहमध्ये जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घेऊन नांव नोंदविण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक सचिव कादर तांबोळी यांनी केले आहे. विजापूर वेस येथील संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष सत्तार नदाफ, जावीद काझी, मकसूद शेख, बखतीयार सय्यद, इस्माईल डीके, जाकीर शेख, रियाज शहाजी, शकील बागबान यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन संस्थेतर्फे अय्यूब नल्लामंदू यांनी केले आहे

### श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाच्या वतीने बुधवारी सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाच्या वतीने बुधवार दि. १ मे २०२४ रोजी दुपारी १२.३१ वाजता सोलापुरातील बापूजी नगर येथील मारुती मंदिर पटांगण येथे सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष करेप्पा जंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली. गेल्या २९ वर्षापासून अखंडितपणे हा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येत असतो. आत्तापर्यंत १२९५ जोडप्यांचा विवाह यशस्वीपणे पार पाडण्यात आला आहे. यंदा २३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा होणार आहे. यावेळी आ. प्रणिती शिंदे आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, माजी आ. प्रकाश यलगुलवार, माजी आ. नरसय्या आडम, अविनाश महागावकर , लक्ष्मण जाधव, माणिक नारायणपेठकर, चिनू नारायणपेठकर माजी महापौर संजय हेमगड्डी, महेश कोठे, समाज अध्यक्ष देवेंद्र भंडारे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल , जॉन फुलारे, भारत जाधव, संतोष पवार, फारूक शाब्दी , महादेव कोगनुरकर, दशरथ गोप यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विवाह सोहळ्यात सुमारे १५ हजार लोकांना स्नेहभोजन देण्यात येते. लग्नानंतर जोडप्यांची बापूजी नगर ते लष्कर पर्यंत वरात काढण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस दत्तू आसादे, रवी म्हेत्रे , लिंगराज पलोलू, सागर शिंगे, नरसिंग म्हेत्रे, श्रीनिवास म्हेत्रे, अंजन मिसालोलू आदी उपस्थित होते.

### पैशाच्या कारणावरून तरूणास मारहाण करून जखमी

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

पैशाच्या कारणावरून समाधान आदिनाथ गायकवाड (वय ३९, रा. पेहे, ता. पंढरपूर) यांस मारहाण करून जखमी करण्यात आले. २७ एप्रिल रोजी रात्री समाधान गायकवाड यांस गावामध्ये पैशाच्या कारणावरून महेश गायकवाड, कपिल पाटील, रविंद्र भिंगारे यांनी काठी व दगडाने डोक्यात मारून जखमी केले. त्यांमुळे समाधान यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## निधन वृत्त...

### यासीन सय्यद



**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

सोशल उर्दू महाविद्यालयातील निवृत्त शिक्षक व सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत यासीन सय्यद (वय ७५) यांचे ३० एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुली एक मुलगा नातवंडे असा परिवार आहे. सायंकाळी चिराग अली कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आले.

### विश्वनाथ महेश्वरंम्



**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

निलम नगर येथील विश्वनाथ भूमय्या महेश्वरंम् (वय ५५) यांचे मंगळवारी सांय ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा १ मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

### वैभव सुतार



**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

शाहीर वस्ती येथील वैभव मनोहर सुतार (वय ३०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक बहीण आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# भटका समाज विकासापासून अद्यापही वंचितच : अॅड. रेणके

**काँग्रेस व्हीजेएनटी विभागाच्या कार्यकर्त्यांचा शुक्रवारी मेळावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

दहा वर्षात भाजप सरकारच्या कार्यकाळात महाराष्ट्रातील भटका समाज विकासापासून वंचित आहे. सरकारी संस्थांचे खाजगीकरण करून मागासवर्गीयांच्या नोकऱ्याच्या संधी बंद करण्यात येत आहेत असा आरोप करत काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे मागासवर्गीयांना सामाजिक न्यायांचे प्रतिबिंब आहे, अशी भूमिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व्हीजेएनटी विभागाच्या प्रदेशाध्यक्ष अॅड. पल्लवी रेणके यांनी मांडली.

काँग्रेसच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजेएनटी) विभागाच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्यभर सभा, मेळावे घेऊन प्रचार यंत्रणा राबविण्यात येत आहे. दरम्यान, सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात सहा दिवस या प्रचार दौऱ्यावर आहेत. यादरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी आपली भूमिका मांडली.

तत्कालीन काँग्रेसच्या केंद्र सरकारने २००६ रेणके आयोगाची स्थापना करून जातीनिहाय जनगणना व भटक्या विमुक्तांचा राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र प्रवर्ग निर्माण करून त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आणि निधी उपलब्ध करून देण्यात येईल यासह विविध क्रांतिकारी शिफारशी यांच्या आयोगाने अहवालात केले आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी रेणके आयोग जशाचा तसा लागू करून भटक्या विमुक्तांना न्याय देण्याचे आश्वासन दिले आहे. काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे मागासवर्गीयांना सामाजिक न्यायाचे प्रतिबिंब आहे, असेही एड. रेणके म्हणाल्या. भाजप सरकारने सरकारी संस्थांचे खाजगीकरण केले. मागासवर्गीयांच्या सरकारी नोकरीतील संधी बंद करण्याचा चंग बांधला आहे. जनता त्रस्त झाली आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे, असा आरोप एड. यांनी केला. भाजप सरकारच्या काळात सुडाचे राजकारण होत आहे. जाती धर्मात तेढ निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणली जात आहे, असा आरोप एड. रेणके यांनी केला आहे.

सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी व्हीजेएनटी विभागाच्या वतीने शुक्रवार दि. ३ मे २०२४ रोजी दुपारी १२ वाजता सोलापुरातील काँग्रेस भवन येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेसचे उमेदवार आ. प्रणिती शिंदे, अॅड. अध्यक्षा पल्लवी रेणके, प्रदेश सामाजिक न्याय विभागाचे कार्याध्यक्ष बादल गायकवाड, सुधाकर बडगुजर, एड. नंदकुमार पवार , काँग्रेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे, प्रा. भोजराज पवार ,मल्लेश सूर्यवंशी, या विभागाचे पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष युवराज जाधव, अंबादास जाधव, गुरु वरगंटे , मोतीराम चव्हाण, लक्ष्मण भोसले, भीमराव बंडगर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन एड. रेणके यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष युवराज जाधव, बादल गायकवाड, सुधाकर बडगुजर, प्रा. भोजराज पवार, मल्लेश सूर्यवंशी, भीमराव बंडगर, लक्ष्मण भोसले, अंबादास जाधव आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## मार्डीच्या यमाई देवीची यात्रा आजपासून प्रारंभ

**विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील श्री क्षेत्र यमाई देवी बुधवार १ मेपासून प्रारंभ होत आहे पाच दिवस यात्रा महोत्सव मोठा उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. येथील यात्रेला मोठी धार्मिक परंपरा आहे. कालआष्टमी दिनी म्हणजेच बुधवारी यात्रा महोत्सवास प्रारंभ होणार आहे. सकाळी देवीची नित्यमहापुजा सर्व गावकरी, मानकरी, भक्तगण यांच्या उपस्थितीत होणार आहे. महापुजा, आरती व नगरप्रदक्षणाही होणार आहे. तर रात्री ९.३० वा. देवीचा छबीना पालखी मिरवणुक व नंतर दुसऱ्या दिवशी गुरुवारी नवमी आहे.रात्री ९.३० वा. दुसरा छबीना निघणार आहे. या कालावधीत सोलापूर शहर, जिल्ह्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व इतर राज्यातून अनेक भाविक मोठ्या संख्येने येत असतात. या यात्रेत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

## विद्यापीठाकडून ई-डॉक्युमेंटसाठी स्टुडंट्स फॅसिलिटेशन सेंटरची सोय

**१ मे पासून सुरुवात; ऑनलाईन प्रमाणपत्रे मिळणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३०-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी आज महाराष्ट्र, संपूर्ण भारतबरोबरच जगाच्या कानाकोपऱ्यात विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे प्रमाणपत्रे ऑनलाईन मिळण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून स्टुडंट्स फॅसिलिटेशन सेंटरची सोय केली आहे.

या ई-विद्यार्थी सुविधा केंद्राची सुरुवात उद्या (बुधवारी) १ मे २०२४ पासून होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या कल्पनेतून या ई-विद्यार्थी सुविधा केंद्राची निर्मिती झाली आहे. या ई-केंद्राच्या माध्यमातून आता विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रमाणपत्रे मिळण्याची सोय खूप सोपी झाली आहे. परीक्षा विभाग तसेच पात्रता विभागाशी संबंधित विविध प्रमाणपत्रे आता ऑनलाईन मिळणार आहेत. विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून चांगल्या व दर्जेदार सुविधा देण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने या ई-विद्यार्थी सुविधा केंद्राची निर्मिती केल्याचे कुलगुरू प्रा.प्रकाश महानवर यांनी सांगितले. कुलगुरू प्रा. महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांचेही सदरील ऑनलाइन विद्यार्थी सुविधा केंद्र सुरू करण्यासाठी सहकार्य लाभले आहे.

**ही ई-कागदपत्रे मिळणार**

* मायग्रेशन प्रमाणपत्र * मार्कशीट व्हेरिफिकेशन * प्रोव्हिजनल डिग्री सर्टिफिकेट * डिग्री सर्टिफिकेट व्हेरिफिकेशन * मिडीयम ऑफ इन्स्ट्रक्शन * प्रोव्हिजनल एलिजिबिलिटी सर्टिफिकेट * अटेस्टेशन ऑफ मार्कशीट अँड डिग्री सर्टिफिकेट * इतर एज्युकेशनल सर्टिफिकेट * डिजिटल कन्टेन्ट प्लॅटफॉर्म अँड ऑनलाईन सर्विस

**अशी असणार प्रक्रिया**

सोलापूर विद्यापीठाच्या sus.ac.in या संकेतस्थळावरून विद्यार्थ्यांना स्टुडंट्स फॅसिलिटेशन सेंटरवर जाऊन आपणास हवे ते कागदपत्र व प्रमाणपत्र मिळण्यासाठी नोंदणी करून अर्ज करावे लागणार आहे. त्यावरून आवश्यक सहकागदपत्रे अपलोड करून व शुल्क भरून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन ट्रेकिंग देखील करता येणार आहे.



# नीलेश गायकवाड अकादमीस विजेतेपद

**यशोदाबाई दिड्डी चषक १६ वर्षांखालील क्रिकेट**

**विरांश शर्मा फलंदाज, मालिका व सामनावीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

नीलेश गायकवाड संघाने यशोदाबाई दिड्डी चषक १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

डोणगाव रस्त्यावरील पुष्प जिमखानाच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी उस्मनाबाद संघावर ९ गडी राखून विजय मिळविला. गायकवाड अकादमीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलदांजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी उस्मानाबादचा डाव २० षटकात ६२ धांवात गुंडाळला. उस्मानाबाद संघाकडून अविष्कर शित्रे याने १४ धावा केल्या. गायकवाड अकादमीच्या चिराग टंकने १८ धावांत २ बळी टिपले. विजयी ६३ धावांचे लक्ष्य गायकवाड अकदामीने १० षटकांत १ गडी गमावित गाठले. त्यांच्या विरांश वर्मा ३९ धावा केल्या. तो उत्कृष्ठ फलंदाजाबरोबरच सामनावीर व मालिकावीरही ठरला. गोलंदाजाचा मानकरी चिराग टंक ठरला.

पारितोषिके डॉ. अमर शेंडे, सोलापूर जिल्हा किकेट असोसिएशन सिनियर निवड समिती सदस्य दत्ता बडगू, श्री. हिरापुरे, राहुल म्हेत्रे, राजेश येमुल व विष्णू गायकवाड आदींच्या उपस्थितीत देण्यात आली. पंच म्हणून चिराग शहा व सुरज गायकवाड तर गुणलेखक म्हणून वर्धन दळवी यांनी काम पाहिले.

## उमेदवार आ. शिंदे, आ. सातपुते यांना खर्चाच्या फरकाबाबत दिल्या नोटिसा

**सोलापूर दि. ३० एप्रिल-**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४, निवडणूक खर्च संनियंत्रण यांवरील अनुदेशांचा सारसंग्रह जानेवारी २०२४ अन्वये ४२, सोलापूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघातील उमेदवारांची खर्चाच्या नोंदवह्या तपासणीच्या वेळापत्रकानुसार दुसरी तपासणी खर्च निरिक्षक उमेश राठोड यांच्या उपस्थितीत ३० एप्रिल रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे करण्यात आली. आ. प्रणिती शिंदे व आ. राम सातपुते या दोन उमेदवारांना फरकाबाबतच्या नोटीस देण्यात आल्या आहेत. दुस-या तपासणीवेळी सर्व उमेदवार उपस्थित होते. तथापी प्रणिती सुशिलकुमार शिंदे व राम विठ्ठल सातपुते या दोन उमेदवारांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या स्वाक्षरीने फरकाबाबतच्या नोटीस देण्यात आल्या आहेत.

नगरपंचायत, वैराग
दि. २४/०४/२०२४
जा.नं. १२८३
फा.नं. नामांतरण १८६६/२०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व नागरिकांना कळविले जाते की, श्री. शिवशंकर भिमाशंकर साखरे, सि.स.नं. - गट नं. ४०६/१/१ प्लॉट नं. ६ पै. न.प. मिळकत नं. - चे वर नामांतर करिता अर्ज दाखल केला आहे. त्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

**पूर्व** - रस्ता, **पश्चिम** - जामदार यांची जमीन,
**दक्षिण** - साखरे यांची जागा, **उत्तर** - प्लॉ. नं. ७

वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत ज्या कोणास जो काही आक्षेप असेल तो (१५) दिवसाचे आत इकडील कार्यालयास दाखल करावा नसता मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

सही/-
मुख्याधिकारी
वैराग, नगरपंचायत वैराग

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे चप्पळगांव, ता. अक्कलकोट येथील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चप्पळगांव, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ३३४/१ यांसी क्षेत्र ० हेक्टर ८१.९० आर पो.ख.०.०५.०० सहीतची एकूण क्षेत्र ०.८६.९० हेक्टर आर चौ.मी. ही मिळकत श्री. अताउल्लाह हुसेनबाशा पटेल यांच्या प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीची असून, सदर शेतजमीन श्री. अताउल्लाह हुसेनबाशा पटेल यांनी यांच्या कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढली असता, आमचे अशिल सौ. रुपाली नागनाथ नारंगकर व सौ. सुजाता विठ्ठल नारंगकर यांनी संयुक्त मालकी हक्कांने योग्य त्या मोबदल्यात कायम खुषखरेदी घेण्याचे ठरवून, सदर शेतजमीनीचे लवकरच खरेदीदस्त लिहून नोंदवून घेणार आहेत. सदरील शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही जमीन मालकांनी आम्हांला दिली आहे.

तथापि, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क अथवा हितसंबंध, वारसा, खरेदी, साठेखत, गहाणखत, दान, बक्षीस, पोटगी, अंग वस्त्र एखाद्या न्यायालयातील वाद मिळकत, तसेच तहसिलदार अथवा इतर कोणत्याही महसुली खात्याकडील अर्ज वगैरे तसेच राष्ट्रीयकृत बँका, सहकारी सोसायटी, बोजा, सावकारी कर्ज, खाजगी कर्ज नसल्याचा भरवसा जमीन मालकांनी आमच्या अशिलांना दिला आहे. तथापि, वर नमुद केल्याप्रमाणे कोणाचा कसलाही हक्क अथवा हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खाली नमुद पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह येऊन आमच्या अशिलांची खात्री करावी. या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदरची शेतजमीन ही निर्वेध व निजोखमीची आहे असे समजून आमचे अशिल कराराप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचेही कसलीही तक्रार चालणार नाही याची, सक्तरित्या नोंद घ्यावी, कोणाचेही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे, तारीख ३०/०४/२०२४.

अशिलातर्फे अॅडव्होकेट
सही/-
(अॅड. एस.जी. वंगे)
रा. चपळगांववाडी,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
मो.नं.: ९६२३२३१२८१, ९८२३५०६८८१

स्पे.मु.नं. १६७/२०१७
नि.१२

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (श्रीमती कौठुळे सो) यांचे कोर्टात**

**कॅनरा बँक, सरस्वती चौक, सोलापूर - वादी**
विरुध्द
**श्री. पंडीत सिद्राम सलगरे - प्रतिवादी**

**प्रतिवादी** - श्री. पंडीत सिद्राम सलगरे
वय ३२ वर्षे, धंदा ऑटो रिक्शा सर्व्हिस,
रा. ७३, आवसेकर वस्ती, स्वामी वस्ती, शेळगी, सोलापूर

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदर कामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स/नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरुध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख १०/०६/२०२४ रोजी स्वत अथवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश में कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक माहे इसवी सन ३०/०४/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश व. स्तर कल्याण

रे.मु.नं. ४५७/२०२१

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (श्री. वराडे सो) यांचे कोर्टात**

**कॅनरा बँक, एस.एम.ई.** - **वादी**
अशोक चौक, सोलापूर
विरूध्द
**विनायक श्रीकांत जाधव** - **प्रतिवादी**

**प्रतिवादी** :- विनायक श्रीकांत जाधव
वय : ३४ वर्षे, धंदा नोकरी,
रा.घर नं.२, साक्षी रेसिडेन्सी,
वेदांत नगर, सोलापूर.

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदरकामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स / नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता, सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरूध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख १०/०६/२०२४ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलांमार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची कांहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक माहे इसवी सन २३/०४/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश व. स्तर कल्याण

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु. पल हद्दीतील लोकांना आमचे अशिल श्री. बाळासाहेब पांडुरंग शेरे, रा. अलिपूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी नोटीस देण्यास सांगितलेवरुन व सही केल्यावरुन या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील जमीन क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.

प्लॉट मालक श्री. अतुल ज्ञानदेव कानकात्रे यांच्या मालकीचे बार्शी येथील जुना गट नं. ८३९ ज्याचा नविन गट नं. ८४५ या मिळकतीतील प्लॉट नं. ३७ च्या मुळ क्षेत्रफळापैकी यांचे नावे असणारी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे, अशी मिळकत क्षेत्र चौ.मी. ३००.१० व ७/१२ उताऱ्याप्रमाणे चौ.मी. ३००.०० यापैकी कानकात्रे यांचे मिळकतीपैकी पूर्व बाजुचा प्लॉट याचे क्षेत्रफळ चौ.मी. १८५.८७ याचे मोजमाप पुर्व बाजु १५.८५ मी., दक्षिण बाजु ११.७२ मी., पश्चिम बाजु १५.८५ मी. व उत्तर बाजु- ११.७२ मी. यांसी चतुः सिमा पुर्वेस ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस स.ग.नं. पैकी उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस मुळ मालक शोभा सुरेश अडसुळ यांचा उर्वरीत प्लॉट व उत्तरेस- स.ग.नं. पैकी क्षेत्र, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक क्षेत्र व आतील तदंगभूत वस्तुसह.

वरील वर्णनाचा प्लॉट कानकात्रे यांच्या मालकीचा असून, त्यांनी विक्रीस काढल्याने आमचे अशिल व त्यांच्यामध्ये सदर प्लॉटबाबत खरेदी घेण्याचा व्यवहार ठरवून सदर खरेदीखताची ठरलेल्या रक्कमेपैकी आमचे अशिलांकडुन काही रक्कम स्विकारलेली असून, त्यांनी आमचे अशिलास रजिस्टर खरेदीखत करुन देण्याचे ठरविले आहे. सदरचा प्लॉट निर्वेध, निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. परंतु, वर वर्णन केलेला प्लॉटबाबत कोणाचीही (व्यक्ती अथवा संस्थांचा) कसल्याही प्रकारची हरकत, हक्क, हितसंबंध, दावा, लिज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार, वाटणी हक्क, खरेदी-विक्री, वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबंध वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद प्लॉटचा आमचे अशिल पुढील रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तनंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर व प्लॉटवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली आहे.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारिख ३०/०४/२०२४.

अशिलातर्फे
सही/-
अॅड. श्री. रोहित अनिल जोशी
B.Sc. Hon's, L.L.B.
ब्राह्मण गल्ली, बार्शी
मो.नं. ९९२३३३२३२९

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील लोकांना आमचे अशिल श्री. बाळासाहेब पांडुरंग शेरे, रा. अलिपूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी नोटीस देण्यास सांगितलेवरुन व सही केल्यावरुन या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील जमीन क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.

प्लॉट मालक शोभा सुरेश अडसुळ यांच्या मालकीचे बार्शी येथील जुना गट नं. ८३९ ज्याचा नविन गट नं. ८४५ या मिळकतीतील प्लॉट नं. ३७ चे श्री. अतुल कानकात्रे यांना विक्री केल्यानंतरचे उर्वरीत बांधकाम केलेले क्षेत्रफळ जे प्लॉट धारक यांचे नावे असणारे व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे. अशी मिळकत ७/१२ उताऱ्याप्रमाणे ०.०१.१५ आर. आहे. प्लॉट मालक यांचा बांधकाम केलेला प्लॉट यांसी चतुःसिमा पुर्वेस- श्री. अतुल ज्ञानदेश कानकात्रे, दक्षिणेस स.ग.नं. उषाताई गव्हाणे, पश्चिमेस- लोकरे यांचा प्लॉट व उत्तरेस स.ग.नं. पैकी अशोक जाधव, याचे पाणी व वागणुक पुर्व बाजुचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक क्षेत्र व आतील तदंगभूत वस्तुसह.

वरील वर्णनाचा प्लॉट अडसुळ यांच्या मालकीचा असून, त्यांनी विक्रीस काढल्याने आमचे अशिल व त्यांच्यामध्ये सदर प्लॉटबाबत खरेदी घेण्याचा व्यवहार ठरवून सदर खरेदीखताची ठरलेल्या रक्कमेपैकी आमचे अशिलांकडुन काही रक्कम स्विकारलेली असून, त्यांनी आमचे अशिलास रजिस्टर खरेदीखत करुन देण्याचे ठरविले आहे. सदरचा प्लॉट निर्वेध, निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. परंतु, वर वर्णन केलेला प्लॉटबाबत कोणाचीही (व्यक्ती अथवा संस्थांचा) कसल्याही प्रकारची हरकत, हक्क, हितसंबंध, दावा, लिज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार, वाटणी हक्क, खरेदी-विक्री, वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबंध वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद प्लॉटचा आमचे अशिल पुढील रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर व प्लॉटवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून सदरची खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली आहे.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली. तारिखः ३०/०४/२०२४

अशिलातर्फे
सही/-
अॅड. श्री. रोहित अनिल जोशी
B.Sc. Hon's, L.L.B.
ब्राह्मण गल्ली, बार्शी
मो.नं. ९९२३३३२३२९

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### ‘उत्कर्ष’मध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सांगोला, दि. ३० एप्रिल-**

उत्कर्ष प्राथमिक विद्यालयातील सन १९८४ साली पहिलीत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा ४० वर्षानंतर स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. सेवानिवृत्त शिक्षिका मंगल लाटणे, सुधामती लोंढे, संजीवनी भोसेकर, धनश्री देशपांडे, सुशीला पाटील, विजया खडतरे, तत्कालीन मुख्याध्यापिका शालिनी कुलकर्णी, विद्यमान मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे यांनी औक्षण करुन तर संस्थाध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर यांनी पेढा भरवून माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व प्रार्थनेने करण्यात आली. डॉ. शालिनी कुलकर्णी, संजीवनी भोसेकर, विजया खडतरे, प्रा. राजेंद्र ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. संजीवनी केळकर यांनी व्हिडिओद्वारे संस्था करीत असलेल्या उपक्रमांची व प्रगतीची माहिती दिली. सूत्रसंचालन ॲड. सचिन पाटकुलकर यांनी केले. माजी विद्यार्थी दीपाली लाटणे व आतिश गाडे यांनी पुढाकार घेऊन व्हॉटस् ग्रुप तयार करुन सर्वांना एकत्र आणल्याबद्दल कौतुक करण्यात आले. यावेळी स्वाती वांगीकर, ज्योती बेंदगुडे, रसिका भंडारे, रुपाली भंडारे या माजी विद्यार्थिनी तर असिफ तांबोळी, सचिन पतंगे, अमर कांबळे, महेश गुरव, विकास बोत्रे हे माजी विद्यार्थी उपस्थित होते.



### डॉ. पाटील यांची कवठेकर प्रशालेस भेट

**पंढरपूर, दि.३० एप्रिल -**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेस रॉयल रायडर्स नाशिकचे समन्वयक डॉ.आबासाहेब पाटील यांनी कवठेकर प्रशालेस सोमवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय.पाटील यांनी प्रारंभी कार्यक्रमास उपस्थित प्रमुख अभ्यागत डॉ. आबासाहेब पाटील व त्यांच्या सर्व कुटुंबीयांचे स्वागत करून डॉ. पाटील यांच्या सायकालिंगच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. डॉ. आबासाहेब पाटील यांनी आपण मागील पंचवीस वर्षांपासून सायकलिंगच्या माध्यमातून महाराष्ट्रभर भ्रमंती करून गड, किल्ले व अनेक ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविले यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली अधिकाधिकपणे सायकलचा वापर करण्याचे आवाहन केले. तदनंतर वैशाली पाटील व सहकुटुंबिय सारिका देसले यांनीही आरोग्याचे महत्व स्पष्ट केले. ज्येष्ठ पर्यवेक्षक सु.शि.रुपनर यांनी आभार मानले. कार्यक्रमास इयत्ता दहावी उन्हाळी वर्गाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर बंधू उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक ना.गो.कुलकर्णी यांनी केले.



### धर्मसंकीर्तन महोत्सवात शास्त्रीय भक्तीसंगीत

**अक्कलकोट, दि. ३० एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन सोहळ्यातील आजचे सहावे पुष्प पुण्यातील स्वामीभक्त गायिका माधुरी करंबेळकर, डॉ.राजश्री महाजनी, सहगायक तुषार केळकर यांच्या शास्त्रीय गायन व भक्ती संगीत गायन सेवा सादरीकरणाने गुंफले गेले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवर कलाकारांचा मंदिर समितीच्या वतीने समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सत्कार केला. या गायन सेवेत त्यांना सहगायन व हार्मोनियम वादन तुषार केळकर,तबल्यावर पं.पराग हिरवे यांनी साथ संगत केली. प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले तर सूत्रसंचालन मिलींद करंबेळकर यांनी केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, अमर पाटील, गिरीश पवार, मोहन जाधव, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, सुरेखा तेली, कौशल्या जाजू, उज्वला सरदेशमुख, सागर गोंडाळ, स्वामीनाथ माटके, विपुल जाधव, प्रसाद सोनार, शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, सचिन पेठकर, संतोष पराणे, अभिषेक गवंडी, स्वामीनाथ गायकवाड, प्रसाद किलजे उपस्थित राहून या शास्त्रीय व भक्ती संगीत सेवेचा लाभ घेतला.

### अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याप्रकरणी एका विरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि. ३० एप्रिल-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कशाचे तरी फूस लावून आई, वडिलाच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याप्रकरणी दऱ्यप्पा सदाशिव जिरेअंकलगी याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.ल यातील फिर्यादी पिडीत मुलीची आई व पिडीत मुलगी दि. २५ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता जेवण करुन घरातील अंगणात झोपले होते. रात्री ११ वाजता फिर्यादीस अचानक जाग आली. त्यावेळी फिर्यादीच्या शेजारी झोपलेली अल्पवयीन मुलगी दिसून आली नाही. फिर्यादीने ती बाथरुमला गेली असे समजून बराच वेळ वाट पाहिल्यानंतरदेखील ती परत आली नसल्याने शेजारी, आजूबाजूला इतर ठिकाणी तिचा शोध घेतला. मात्र ती मिळून आली नाही. फिर्यादीने तिच्या नातेवाईकांना कॉल करुन घटना सांगून घराकडे बोलावून घेतले व सदर आरोपीचा संशय आल्याने आरोपीच्या घरी जाऊन चौकशी केली त्यावेळी तोही घरी दिसून आला नसल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान आरोपीच्या चुलत भावाने आरोपीस ताब्यात घेऊन मंगळवेढा पोलीस ठाण्यात हजर केल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# लोकशाहीत ‘ठोकशाही’ चालू दिली जाणार नाही

## माळशिरसला दहशतीतून मुक्त करणार; फडणवीसांचा मोहिते-पाटलांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**

माढा लोकसभा मतदारसंघील भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यावर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे त्यांना तिकीट मिळालं नसल्याचा दावा केला जात होता. याच मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोहिते-पाटलांना थेट इशारा दिला आहे.



माळशिरस तालुक्याला मोहिते-पाटलांच्या दहशतीतून मुक्त करणार, रणजितसिंह निंबाळकर यांच्याविरोधात उभे राहिलेल्या उमेदवाराचं प्रतिज्ञापत्र पाहा. माळशिरस तालुक्याला त्यांच्या दहशतीतून मुक्त करणार आहे. त्यांनी सामान्य माणसाला त्रास दिला, जमिनी बळकावल्या, लोकांचे खून आणि हल्ले केले. हे सहन केलं जाणार नाही. ही लोकशाही आहे, ठोकशाही नाही. इथे ठोकशाही चालू दिली जाणार नाही.असा इशारा दादा त देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ५० वर्षे ज्यांना नेतृत्व दिलं, ते प्रत्येक निवडणुकीत तीच-तीच भाषणं देत घोषणा करत होते. पण, त्या घोषणा कधीही पूर्ण झाल्या नाहीत, असा हल्लाबोलही फडणवीसांनी मोहिते-पाटलांवर केला आहे.

माढा मतदारसंघातील उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पार पडली.

### ३६ गावांच्या पाण्याचा प्रश्न सोडविणार

रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मोदी यांच्याबरोबर संसदेत पाठवले. त्यामुळे माळशिरसमध्ये पाणी आणि रेल्वेदेखील आली. भविष्यात ३६ गावांच्या पाण्याचा प्रश्न मोदी यांच्या माध्यमातून सोडविल्याशिवाय शांत बसणार नाही. यापूर्वी कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेचा मोठा गवगवा करण्यात आला. या भागातील लोकांना वारंवार पाणी देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, मी मुख्यमंत्री झाल्यावर कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेची फाइल उघडली आणि तेव्हा पाणी उपलब्ध नाही, योजना करता येणार नाही, म्हणून ती फाइल बंद केली,असेही फडणवीसांनी सांगितले.

## मंगळवेढा तालुक्यातील अनेक शेतकरी पीक विम्यापासून वंचित

**प्रचारासाठी कोणीही न येण्याचा दिला इशारा**

**भोसे गटातील शेतकऱ्यांमधून संताप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्यातील मौजे भोसे गटातील व इतर गावातील अनेक शेतकऱ्यांना डाळिंब व इतर पिकांचा गेल्या सहा वर्षांपासून पीक विमा मिळाला नाही. केवळ आश्वासन देऊन फसवणूक करण्यात आली आहे असा आरोप करत या परिसरात प्रचारासाठी कोणी येऊ नये, असा इशारा बळीराजा एकता समितीचे प्रदेशाध्यक्ष श्रीशैल हत्ताळी-बिराजदार यांनी येथील शेतकऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

मौजे भोसे गटातील शेतकऱ्यांना सन २०१८ -१९ ते आजतागायतपर्यंत सहा वर्षापासून पाठपुरावा करूनही पिक विमा मिळाला नाही. आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडून आश्वासन दिले. त्यानंतर पावत्या जमा केल्या. पत्रव्यवहार करूनही अद्यापही न्याय मिळाला नाही. फळ पिकांसाठी रिलायन्स कंपनीकडे विमा उतरवला आहे. मुख्यमंत्र्यांना भेटूनही आश्वासनापलीकडे काही मिळाले नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठी या भागात कोणीही येऊ नये अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा या शेतकऱ्यांनी दिला आहे. मंगळवेढा दक्षिण भागात म्हैसाळ कॅनॉल मधून लवकरात लवकर पाणी सोडण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.भविष्यातही न्याय न मिळाल्यास अखेर आगामी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालावा लागेल अशी भूमिका येथील संतप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेस श्रीशैल हत्ताळी, महादेव इंगोले, आहिलप्पा पुजारी, लक्ष्मण क्षीरसागर, नीलकंठ साखरे, काशिनाथ लेंगरे आदी उपस्थित होते.

## माढा मतदारसंघात एक मतदान केंद्रावर लागणार तीन बॅलेट मशीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर आणि माढा लोकसभा निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून, मशीनवर चिन्ह, उमेदवारांचे नाव तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे.

दरम्यान, माढा मतदारसंघात गतवेळच्या निवडणुकीपेक्षा यंदा एक उमेदवार अतिरिक्त झाल्याने निवडणूक आयोगाची आणि जिल्हा प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. २०१९ साली माढा लोकसभेसाठी ३१ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. तर प्रत्येक बॅलेट मशीनवर १६ या प्रमाणे दोन मशीनवर ३२ उमेदवार सामावले होते. त्यामुळे गतवेळच्या निवडणुकीत एका मतदान केंद्रावर दोन बॅलेट मशीन पुरेशा होत्या. यंदाच्या निवडणुकीत मात्र ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने दोन मशीनऐवजी नोटाच्या एका पर्यायासाठी स्वतंत्र एक मशीन लावण्याची वेळ आली आहे. त्यामुळे माढ्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर आता तीन मशीन लागणार आहेत. त्यामुळे संपूर्ण मतदार संघात आता २२०० मशीन वाढल्यामुळे प्रशासनाचीही डोकेदुखी वाढली आहे.

३२ उमेदवारांची यादी सामावली असली तरी मतदारांना नोटाच्या पर्यायासाठी स्वतंत्र मशीन लावण्याची वेळ निवडणूक कार्यालय आणि निवडणूक आयोगावर आली आहे.

## पेशवा युवा मंचच्या वतीने सामुदायिक व्रतबंध सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**

येथील पेशवा युवा मंचच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी सामुदायिक व्रतबंध सोहळा संपन्न झाला. यावेळी २१ बटूंनी या सोहळ्यात सहभाग घेतला होता.

येथील पद्मशाली धर्मशाळा येथे आयोजिलेला हा व्रतबंध सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक बटूस मंचतर्फे सोवळे, उपरणे, पळी, पेला, ताम्हण व संध्येची पोथी भेट देण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.श्रीप्रसाद महाराज बडवे होते. याप्रसंगी संभाजीनगर येथील एनालायझर युट्युब चॅनेल चे संपादक सुशील कुलकर्णी तसेच पुणे येथील धर्मशास्त्र अभ्यासक



अशोक काका कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या व्रतबंध सोहळ्याचे पौरोहित्य आकाश पारनेरकर गुरुजी व श्री विठ्ठल रुक्मिणी वेदपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी बटूंना शुभ आशीर्वाद देण्यासाठी आमदार समाधान आवताडे, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेशजी परिचारक, मनसे नेते दिलीप धोत्रे, विठ्ठल बडवे, वे.मू. कुमार पिंपळनेरकर, ऋषिकेश उत्पात, माजी नगरसेविका सुप्रिया डांगे, डॉ. प्रसाद खाडिलकर, आनंद नगरकर, नादब्रह्म महिला मंडळाच्या वैशाली काशीद,अमृता बडवे,आदर्श व बाल प्राथमिक मंदिर च्या मुख्याध्यापिका माया सांगोलेकर, रेवती बडवे आदी मान्यवर उपस्थित होते. येथील प्रदक्षिणा मार्गावरून सायंकाळी बटूंची सवाद्य, भव्य शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अभिजीत पुराणिक, उपाध्यक्ष गौरव देशपांडे यांसह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.



## रंगभवन, पाण्याच्या टाकी जवळील बस थांब्याजवळ निवारा शेड उभे करा

**प्रवासी वर्गातून मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर शहरातील रंगभवन व पाण्याची टाकी या ठिकाणी एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गासाठी निवारा शेड उभे करण्याची मागणी हजारो एसटी बस प्रवासी वर्गातून केली जात आहे.

गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर येथे दररोज जाणाऱ्या येणाऱ्या एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गातून या ठिकाणी निवारा शेड उभी करण्याची मागणी केली जात आहे. पण एसटी महामंडळाकडून या मागणीला वाटाण्याच्या अक्षता दाखविण्यात येत आहेत. त्यामुळे हजारो प्रवासी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

अक्कलकोट शहर व तालुक्यातून सोलापूर येथे कामानिमित्त विविध कार्यालयातील कामानिमित्त ऑफिसच्या कामानिमित्त दररोज हजारो एसटी प्रवासी हे एसटी बस मधून प्रवास करतात. दोन्ही बस थांब्यांवर निवारा शेड नसल्याने उन्हाळा पावसाळा हिवाळा या तिन्ही ऋतूमध्ये प्रवासी वर्गाला उघड्यावरच उभे राहण्याची वेळ आली आहे. अनेकवेळा एसटी महामंडळाला याबाबत निवेदन देऊन सांगून सुद्धा याकडे एसटी महामंडळ हे अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. गेल्या अनेक वर्षापासून अक्कलकोट शहर तालुक्यातील प्रवासी वर्गाचे रंगभवन व पाणी टाकी या बस थांब्यांवर निवारा शेड उभे करण्याची मागणी होत आहे. पण या मागणीला एसटी महामंडळ प्रशासनाकडून वाटाण्याच्या अक्षता लावण्यात येत आहेत. यामुळे प्रवासी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे. या दोन्ही बस थांब्यांवर लवकरात लवकर प्रवासी निवारा सेड उभे न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांकडून देण्यात आला आहे.

## ‘तू सर्वज्ञा हो’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० एप्रिल-**

बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये तू सर्वज्ञा हो या सर्वज्ञा बेकरे लिखित काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. बी. वाय. यादव होते.

यावेळी प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांनी सर्वज्ञा बकरे हिच्या काव्यसंग्रहाचे मुक्तकंठाने स्तुती करत उपस्थितांना उत्तम मार्गदर्शन केले. सर्वज्ञा बकरे या सतरा वर्षाच्या विद्यार्थिनीच्या कविता प्रगल्भ आशय सूत्रांनी भरलेल्या आहेत. सर्वज्ञाची कविता सर्व स्पर्शी आहे. आजच्या वर्तमान जगातील संपूर्ण मानवतेला अशाच निष्कलंक कवितेची गरज आहे. सर्वज्ञाची कविता चारित्र्यसंपन्न असून तिचा आकृतीबंध सुंदर आहे. शुद्ध, सात्विक विचार व तरल संवेदनाची ही कविता सर्वांना आश्वासक आहे, असे प्रतिपादन डॉ. सबनीस यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांनी समायोजित विचार व्यक्त केले. यावेळी तू सर्वज्ञा हो काव्यसंग्रह निर्मितीसाठी मेहनत घेतलेले श्रीधर कांबळे व मुद्रक गिरीश सोनार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. डॉ. मृणाल बकरे यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. सुधीर बकरे यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

वर्षा रसाळ यांच्या पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला शहरातील सर्व सन्माननीय डॉक्टर, वकील, प्राध्यापक, साहित्य क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

## अंबिकानगर जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकाची राज्यस्तरावर दखल

**शिवशंकर राठोड यांना राज्यस्तरीय पुरस्कार**

**विज्ञानातील योगदानामुळे सर्वस्तरातून कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० एप्रिल-**



सोसायटी फॉर सोशल इनोवेशन ॲन्ड डेव्हलपमेंट, पुणे यांच्यामार्फत विज्ञान विषयामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना दिला जाणारा राज्यस्तरीय एसएसआयडी इनोव्हेटिव्ह टीचर एक्सलन्स ॲवॉर्ड अंबिकानगर शाळेचे शिक्षक शिवशंकर राठोड यांना जाहीर झाला आहे.

अंबिकानगर जिल्हा परिषद शाळेत ते विज्ञान विषय शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराची घोषणा नॅशनल केमिकल लॅबोरेटरी पुणे येथील निवृत्त वैज्ञानिक अधिकारी व एसएसआयडी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष कत्ते यांनी केली आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व पाच हजार रूपये असे आहे. एका विशेष कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

राठोड यांनी आपल्या शाळेमध्ये प्रयोगशाळा निर्माण केली असून त्याच्या माध्यमातून प्रयोगातून विज्ञान हा उपक्रम राबविले जात आहे. विद्यार्थी स्वतः साहित्यांची निवड करून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रयोग करतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील विंग्स ऑफ फायर सोशल अँड एज्युकेशनल इनोवेशन अवॉर्ड हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कार निवडीबद्दल उत्तर सोलापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार, केंद्रप्रमुख गुंडीबा हरगुडे, विठ्ठलसिंह रजपूत, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा लक्ष्मी कनकधर, उपाध्यक्षा कल्पना अडगळे, मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे यांनी अभिनंदन केले.

### विज्ञान प्रदर्शनाला डॉ. नातू यांची भेट

विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांचे विज्ञान साहित्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनास जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांनी भेट देऊन कौतुक केले आहे. शाळेच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन स्वच्छ, सुंदर शाळा अभियानात मोलाची कामगिरी बजावली आहे.

## पोस्टल मतदानाला मुदतवाढ

**उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

लोकसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षांच्या पुढील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती यांचे घरातून मतदान करून घेणे २६ एप्रिलपासून सुरू आहे. तर २८ एप्रिलपासून शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे पोस्टल मतदान सुरू आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यावर बंदोबस्त ताण असल्याने पोस्टल मतदानाची मुदत वाढवण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.

सोलापूर लोकसभा मतदार संघात १,२१८, तर १२३ दिव्यांग मतदारांनी घरातून मतदान केले. अत्यावश्यक सेवेतील ५२९ कर्मचाऱ्यापैकी २५७ जणांनी मतदान केले आहे. असे दि. २९ एप्रिलपर्यंत १५९८ मतदान पार पडले आहे. तर माढा लोकसभा मतदारसंघात दि. २९ एप्रिलपर्यंत १ हजार ७९३ मतदान झाले आहे. यातील ८५ वर्षांवरील १ हजार ५४८, दिव्यांग २०४ आणि अत्यावश्यक सेवेतील ४१ मतदान झाले आहे. दरम्यान, पोस्टल मतदानांची मुदत वाढवण्याबाबत चर्चा सुरू असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सांगोला शहरातील मतदान केंद्राची पथकाद्वारे पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० एप्रिल-**

सध्या देशात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक होत असून पहिल्या दोन टप्प्याचे मतदान झालेले आहे. तिसऱ्या टप्प्याचे मतदान हे दि. ७ मे रोजी होणार असून सांगोला नगरपरिषद हद्दीमध्ये माढा लोकसभा मतदार संघासाठी मतदान होणार आहे. सांगोला शहरातील नागरिकांसाठी ३० मतदान केंद्रावर हे मतदान पार पडणार आहे. ३० मतदान केंद्रे ही ९ ठिकाणी आहेत.

जिल्हा परिषदेचे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, पंचायत समितीचे सहा.गट विकास अधिकारी मिलिंद सावंत यांच्या पथकाद्वारे सांगोला शहरातील मतदान केंद्राची पाहणी करण्यात आली. मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सुविधा यांविषयी सूचना देण्यात आल्या. याप्रसंगी नगरपरिषद,पंचायत समिती येथील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सदर मतदान केंद्रावर मतदारांकरीता शासनाकडून सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. मतदान केंद्र सुस्थितीत असले पाहिजे, मतदान केंद्रावर वॉर्डाचे नाव, क्रमांक, लाईटची व्यवस्था, पंखे, फर्निचर,पिण्याचे पाणी,सार्वजनिक स्वच्छतागृह,दिव्यांग व वयस्कर मतदारांकरीता रॅम्प, व्हिलचेअर,प्रथमोपचार केंद्र, मतदानकेंद्राच्या बाहेर सभा मंडप, दिशादर्शक फलक आदीसुविधा देण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्याबाबत व उन्हामुळे मतदानावर प्रतिकुल परिणाम होवू नये याकरिता सुविधा उपलब्ध पुरविण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.

# विनयभंग व अॅट्रॉसिटीच्या गुन्ह्यातील दोन आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

विनयभंग व अॅट्रॉसिटीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना जिल्हा व सत्र न्यायाधीश संगीता शिंदे यांनी जामीन मंजूर केला. सलीम गुलाब शेख व अजहर सलीम शेख अशी जामीन मंजूर झालेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये फिर्यादी ही पुणे रोडवर जय अंबिका गॅरेज आवारात एक लहान कॅन्टींग चालवत होती आणि सुमारे ६ महिन्यांपूर्वी फिर्यादीने आरोपींकडून १० हजार रुपये मुलीच्या बाळंतपणासाठी हात उसने कर्ज घेतले होते. तसेच आरोपी हा फिर्यादीला वारंवार त्रास देत असत तसेच वाईट हेतूने तिच्याकडे पाहत असत आणि फिर्यादीला माझ्यासोबत चल नाहीतर तू माझ्याकडून घेतलेले ३ लाख रुपये बद्दल तुझ्या नवऱ्याला सांगेन व तुझी बदनामी करेन असा दम देत होता. फिर्यादीला आरोपीने स्वतःने दिलेले कर्जाची रक्कम परत मागितले होती तेव्हा दोन्ही आरोपीने फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ केली होती अशा आशयाची फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्यात पोलिसांनी दोघांना अटक केली होती. या दोघांनी जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय येथे दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन जिल्हा व सत्र न्यायाधीश संगीता शिंदे यांनी आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला आहे. यात आरोपीतर्फे अॅड.कदीर औटी, अॅड. दत्तात्रय कापुरे, अॅड. निलेश कट्टीमनी, अॅड. सोहेल रामपुरे यांनी काम पाहिले.

# मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात पाण्याची तीव्र भीषणता

## १३ टँकरद्वारे दहा गावांना होतोय पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागात पाण्याची तीव्र भीषणता वाढत असल्याचे विदारक चित्र असून आजमितीस १३ टँकरद्वारे १० गावे व ८५ वाडयावस्त्यावरील २५ हजार २३० लोकांना पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती जिल्हा परिषद पाणी पुरवठा उपअभियंता राजकुमार पांडव यांनी दिली.



मंगळवेढा तालुक्यात गतवर्षी पावसाची नक्षत्रे कोरडी गेल्याने भूगर्भात पाणी साठा होवू शकला नाही तसेच नदी,नाले,ओढे,विहिरी पाण्याअभावी कोरडे राहिले.परिणामी ऐन उन्हाळी हंगामात तालुक्याच्या दक्षिण भागात पाण्याची तीव्र भीषणता जाणवत असून नागरिकांना पाणी. पाणी.. म्हणण्याची वेळ आली आहे.मानवाबरोबर मुक्या प्राण्यांचा पाणी प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

बारमाही वाहणारी भिमा व माण नदी यांनी सुद्धा यंदा तळ गाठला आहे. नदीकाठावरील बागायत क्षेत्रही धोक्यात सापडले आहे. सध्या १३ खासगी टँकरव्दारे येड्राव, गणेशवाडी, भाळवणी, आंधळगांव,लक्ष्मी दहिवडी, शिवणगी, बावची, निंबोणी, शिरनांदगी, सरगर खु.,आदी गावे व ८५ वाडया वस्त्यामधील २५ हजार २३० लोकांना १३ खाजगी टँकरच्या प्रतिदिनी १९ खेपा करून पाणी पुरवठा केला जात आहे. येळगी, हिवरगांव, खुपसंगी, मरोळी, भोसे, खवे, लवंगी, हाजापूर, नंदेश्वर, लेंडवे चिंचाळे, रड्डे, दामाजीनगर आदी १२ गावामधून टँकरची मागणी जि.प.पाणी पुरवठा विभागाकडे प्राप्त झाली आहे.

मागील पाच वर्षात मंगळवेढा तालुका हा टँकरमुक्त झाला होता.दुर्देवी निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा पुन्हा टँकर सुरु करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे.सध्या भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य संकूलनातून रड्डे,चाळीस धोंडा,जुनोनी,शिरभावी आदी ठिकाणाहून टँकरव्दारे पाणी भरून संबंधित गावांना पाणी पुरवठा केला जात असल्याचे सांगण्यात आले.भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची पाणी पुरवठा विहिर उचेठाण भिमा नदीपात्रात असून येथून भोसे पाणी पुरवठा योजना ही जवळपास १०५.५ कि.मी.अंतरावर पाणी वाहून पाईपलाईनव्दारे न्यावी लागत असल्याने या पाईपलाईनला अनेक ठिकाणी पाईपलाईन लिकेज होवू नये म्हणून एअरवॉल बसविण्यात आले आहेत. मात्र दक्षिण भागात हे एअरवॉल नागरिक खोलून त्यामधून पाणी घेत असल्याने बरेच ठिकाणी पाणी वाया जात असल्याचे चित्र असून जि.प.पाणी पुरवठा विभागाच्या अधिकार्यांनी हा प्रकार थांबविण्यासाठी नवीन टॉपरप्रुफ वॉल ९ ठिकाणी बसवून पाण्याची गळती थांबविण्याचे प्रयत्न केले आहेत. या योजनेस ४० गावचे सरपंच व ग्रामसेवक यांचे सहकार्य लाभत असल्याने सध्या तरी भोसे पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे चालू असल्याने ऐन पाणी टंचाईच्या कालावधीत, उन्हाळ्यात येथील जनतेला पाणी पुरवठा योजनेचा दिलासा मिळत आहे.

# संचालकांच्या जप्त मालमत्तेचे व्हॅल्युएशन करून रिपोर्ट सादर करा

## ओंकार फायनान्स घोटाळा; उपजिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

ओंकार फायनान्स घोटाळ्याप्रकरणी संचालकांच्या जप्त मालमत्तेचे व्हॅल्युएशन करुन त्याबाबतचा रिपोर्ट न्यायालयात सादर करण्याचे आदेश उपजिल्हाधिका-यांना न्यायालयाने दिले आहेत.

टिळक चौक येथील मे. ओंकार ऑटो फायनान्स (आर) या फायनान्स कंपनीमध्ये गुंतवणुकदारांनी पैशांची गुंतवणूक केली असून त्यामध्ये इतर लोकांना मोठया व्याजाचे आमिष दाखवुन पैशे गुंतविण्यास संचालकांनी भाग पाडले. कंपनीचे मालक मयत ओमप्रकाश दायमा यांनी सर्व गुंतवणूकदारांना आमिष दाखवून तुमच्या गुंतवणुकीवर राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ७ ते ८ टक्के व्याज मिळते, पण आम्ही तुमच्या गुंतवणुकीवर पहिल्या वर्षाला १३ टक्के, दुस-या वर्षाला १४ टक्के, तिस-या वर्षाला १५ टक्के व्याज देतो असे आमिष दाखवुन लोकांना पैसे ठेवण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे सदर फायनान्समध्ये २०० च्या वर गुंतवणुकदारांनी ८ ते ९ करोडची गुंतवणुक केली.

परंतु त्याचा परतावा गुंतवणुकदारांना दिला नाही, त्यामुळे सदर प्रकरणात शिवानंद बागलकोटी यांनी त्यांची फायनान्सच्या संचालकांनी फसवणूक केली म्हणून आरोपींविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सदर ठेवीदारांच्या रकमेस हमी रहावी म्हणून सदरील आरोपींची मालमत्ता शासनाने जप्त केली. त्यामध्ये १८ मालमत्ता व ४ वाहने महाराष्ट्र शासनाने जप्त केली.

सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील अॅड. प्रदीपसिंग राजपूत यांनी न्यायालयास विनंती अर्ज सादर करुन सदर जप्त मालमत्तेची लिलावाने विकी करुन त्यातून येणारी रक्कम गुंतवणूकदारांना परत द्यावी अशी मागणी केली. त्यावेळी न्यायालयाने सदरील जप्त मालमत्तांचे व्हॅल्युएशन रिपोर्ट ३० दिवसात सादर करणेचे काम सक्षम अधिकारी उपविभागीय अधिकारी-२ सोलापूर यांना दिलेले आहेत. ओंकार फायनान्समध्ये पैशे गुंतविणारे लोक हे भाजी विक्रेते व मोलमजुरी करुन जगणारे लोक आहेत. हा आदेश पारीत झाल्यामुळे सर्व गुंतवणुकदारांना न्यायालयाकडुन दिलासा मिळाला आहे व त्यांना त्यांनी गुंतविलेल्या रकमा परत मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

सदरकामी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महा. १६) (यात यापुढे ज्याचा उक्त अधिनियम असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ४ चे पोट कलम (१) व कलम ५ चे पोट कलम (१) व कलम ८ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त वित्तीय संस्थेची आणि त्यांचे संचालक यांच्या नावे असलेली मालमत्ता जप्त करुन सदर वित्तीय आस्थापना आणि त्यांचे संचालक यांच्या जप्त केलेल्या मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी उप विभागीय अधिकारी, सोलापूर क्रमांक २ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील अॅड. प्रदीपसिंग राजपूत व अॅड. माधुरी देशपांडे हे काम पाहत आहेत.



# मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सांगोला तालुक्यात जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० एप्रिल-**

मराठा आरक्षणावर लढा देणारे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे बेळगावच्या दौऱ्यावर जात असताना सांगोला तालुक्यात त्यांचे जल्लोषात स्वागत झाले.

सकल मराठा समाज सांगोल्याच्यावतीने वाडेगाव नाका येथे जेसीबीच्या साह्याने त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करून हलगीच्या कडकडात शहरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास जरांगे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी एक मराठा लाख मराठा अशा घोषणेने परिसर दणाणून गेला होता. त्यानंतर सदानंद मल्टीपर्पज हॉल येथे मराठा लेकीनी जरांगे पाटील यांना औक्षण करून सत्कार केला. यावेळी जरांगे पाटील म्हणाले, मला तोंड आल्यामुळे जास्त बोलता येत नाही. सांगोला शहरातील लोकांना मी एक शब्द देतो, महाराष्ट्रातल्या मराठ्यांच्या शेवटच्या पोराला आणि तुम्हाला आरक्षण दिल्याशिवाय मी मरेपर्यंत मागे हटणार नाही असे म्हणाले.

# पोलिसांच्या ‘त्या’ आदेशाला न्यायालयाची अंतरिम स्थगिती

## निवडणूक काळात शहरात न राहण्याचे कार्यकर्त्यांना दिले होते आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

काँग्रेस आणि एम आय एम पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडणूक काळामध्ये सोलापूर शहरात न राहण्याच्या पोलिसांच्या आदेशास जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी अंतरीम स्थगिती दिली.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेचे अनुषंगाने गुन्हेगारी कृत्ये व कारवायांमुळे शांतता भंग होवून कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होवू नये म्हणून काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक रियाज इब्राहिम हुंडेकरी, वाहिद अब्दुल गफूर विजापुरे, अझर उर्फ गोल्डन खाजाभाई रामपुरे, मैनुद्दीन रफिक हत्तुरे,



मोहसीन गुलाब मैंदर्गी, समीर इब्राहिम हुंडेकरी आणि एमआयएम पक्षाचे माजी नगरसेवक गाझी सादिक जाहगिरदार, वाजिद सालार, आसिफ ऊर्फ आसिम अ. रशिद तुळजापूरे, इफ्तेकार अ. रशिद तुळजापूरे, कमरोद्दीन ऊर्फ कम्मो शेख (सर्व रा. सोलापूर) यांना सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग १ तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर यांनी दि.२७ एप्रिल ते ७ मे २०२४ या कालावधीत सोलापूर शहरात वास्तव्य करायचे नाही असा आदेश दिला होता.

या आदेशाविरूद्ध सर्वांनी न्यायालयात पुर्नयाचिका (रिव्हिजन) दाखल केली होती व सहाय्यक पोलीस आयुक्त, विभाग१ तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर यांचे आदेशास स्थगिती मागितली होती. त्यावर सुनावणी होऊन आरोपींचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीश राणे यांनी २ मे पर्यंत अंतरीम स्थगिती दिली व पुढील सुनावणी २ मे रोजी रोजी ठेवण्यात आली. यात काँग्रेस कार्यकर्त्यांकडून अॅड. रियाज शेख यांनी तर एमआयएम कार्यकर्त्याकडून अँड. प्रशांत नवगिरे, अँड. राहुल रूपनर यांनी काम पाहिले.

# सोलापूर महापालिकेची षष्टब्दीपूर्ती!

## गिरणगाव ते स्मार्ट सिटी असा बदलला चेहरा

## आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौरांनी पाहिला कारभार

## सुमारे ३४०० कर्मचारी ओढत आहेत महापालिकेचा गाडा

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

सोलापूर महापालिकेच्या स्थापनेपासून ६० वर्षाच्या कार्यकाळात सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. या कालखंडात आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले. महापौरपदावर तीन जणांची बिनविरोध निवड झाली. महापालिकेत महापौरपदी एकूण ७ महिला विराजमान झाल्या आहेत तर ६ महिलांना उपमहापौर पदाचा मान मिळाला आहे. महापालिकेचे ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी मिळून महापालिकेच्या कारभाराचा गाडा ओढत आहेत. साठ वर्षाच्या या कार्यकाळात गिरणगाव ते स्मार्ट सिटी सोलापूर शहराचा चेहरा बदलला आहे. सोलापूर महापालिका स्थापना दिन आणि कामगार दिनाच्या निमित्त हे वृत्तविशेष!

एक ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेचे १ मे १९६४ मध्ये महापालिकेत रूपांतर झाले. आज महापालिकेत महापालिका स्थापनेला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. या साठ वर्षाच्या कार्यकाळात मागे वळून पाहताना महापालिका प्रशासन सोलापूर शहर आणि एकूणच कार्यपद्धतीमध्ये फार मोठा बदल झाला असल्याचे दिसून येते. भौतिक सुधारणा प्रकर्षाने झाल्या आहेत मात्र गेल्या वीस वर्षात दररोज पाणी पुरवठ्याची अपेक्षापूर्ती झाली नाही. निवडणुकीचा मौसम आला की नेहमीच आणि दररोज पाणीपुरवठ्याचं गाजर राजकीय धोरणी आणि लोकप्रतिनिधींकडून दाखवले जाते.

सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत साठ वर्षाच्या कार्यकाळात महिला महापौर ,उपमहापौर यांचे योगदान महत्त्वपूर्ण असेच ठरले आहे. त्या-त्या कार्यकाळात महिला महापौर व उपमहापौरांनी आपापल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. सन १९६४ ते २०२२ पर्यंत ३७ महापौर झाले. त्यामध्ये सात महिला महापौर यांना संधी मिळाली. याच कार्यकाळात एकूण ३६ उपमहापौर झाले. त्यापैकी सहा महिला उपमहापौर झाल्या आहेत. पहिले उपमहापौर एन. एम. वडवान हे सर्वाधिक कालावधीसाठी (१९६४-७०) पदावर होते. सोलापूर महापालिकेत महिला पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. महाराष्ट्र शासनाने सोलापूर महापालिकेसाठी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. या आकृती बंधानुसार महापालिकेत ४ हजार ६१२ पदे मंजूर करण्यात आली. मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक ती पदे सोलापूर महापालिका प्रशासनात उपलब्ध नाहीत. मंजूर पदांपैकी ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत उर्वरित १ हजार १२५ म्हणजेच सुमारे २५ टक्के कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर सोलापूर शहराचा कारभार चालला आहे. सहाय्यक आयुक्तांची १२ तर रिक्त आहेत. एकूण अ, ब, क, ड या चारही वर्गातील सुमारे १हजार १२५ पदे रिक्त आहेत.

दरम्यान सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुमारे ६०० कोटींची कामे झाले मात्र यातील अनेक प्रकल्प देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याचेच दिसून येते. तर उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प सध्या मार्गी लागत आहे. साधारणता ७०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. अमृत योजनेअंतर्गत ड्रेनेज आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी सुमारे ९०० कोटीचा निधी मंजूर आहे. सध्या शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. विमान सेवा सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न असून विमानतळ येथील धावपट्टीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. गिरणगाव म्हणून ओळख असलेल्या या शहराला मात्र औद्योगिक दृष्ट्या गती मिळू शकली नाही यामुळे बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून स्थलांतरही मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते महामार्गाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

दरम्यान सोलापूर महापालिका परिवहन उपक्रम अडचणीत आला आहे. सध्या सुमारे २७ बसेस शहरात धावत आहेत.



### तीन महापौर झाले बिनविरोध

महापालिकेच्या इतिहासात फक्त तीन महापौर बिनविरोध निवडले गेले. मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजाचा पहिला व्यक्ती महापौरपदासाठी उभा असल्याने विरोधकांनी उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे युन्नूस शेख (१९७५-७६) यांचीही बिनविरोध निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची बिनविरोध निवड झाली होती.

### महापौर व उपमहापौरपदी या मान्यवर महिलांना संधी

सोलापूर महापालिकेत आतापर्यंत ७ महापौर व उपमहापौरपदी ६ मान्यवर महिलांना संधी मिळाली. महापौरपदी शेवंताबाई पवार (सन १९९७-९८), नलिनी चंदेले (२००२- ०५), अरुणा वाकसे(२००७-०९), अलका राठोड(२०१२-१४), प्रा. सुशीला आबुटे(२०१४-१७), शोभा बनशेट्टी (२०१७-१९) व श्रीकांचना यन्नम (२०१९ -२२) या विराजमान झाल्या होत्या. तर उपमहापौर म्हणून प्रा. नसीमा पठाण(१९७६-७७), सुषमा घाडगे(१९९२-९३), फातिमा शेख(१९९४-९५), महानंदा भोसले(१९९८-९९), सुमन मुदलियार (मार्च १९९९- ऑगस्ट १९९९), शशिकला बत्तुल(२०१७-१९) यांनी कारभार पाहिला.

### पहिल्या महिला आयुक्त शितल तेली-उगले

सोलापूर महापालिकेत साठ वर्षाच्या कार्यकाळात आत्तापर्यंत एकूण तीन वेळा प्रशासकीय राजवट होती. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण सात प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला आहे. आठवे प्रशासक म्हणून सध्या शितल तेली -उगले या कार्यरत आहेत. शितल तेली - उगले या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या आहेत. सोलापूर महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली. यापूर्वीच्या दोन प्रशासकीय राजवटीत एकूण ६ प्रशासकांनी कार्यभार सांभाळला. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्याने लागू केलेल्या सध्याच्या तिसऱ्या प्रशासकीय कारकीर्दीला २ वर्ष पूर्ण झाले आहे. आत्तापर्यंत आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली - उगले या सध्या प्रशासकीय जबाबदारी सांभाळत आहेत.

**प्रशासकीय कारकीर्द :** दि. १ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे २ वर्ष २१ दिवस पहिल्यांदा प्रशासकीय कारकीर्द होती. आणि पुन्हा दि. ६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणता: ४ वर्षे ३ महिने प्रशासकीय कारकीर्द होती. असे यापूर्वी दोन वेळेला प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली होती. १९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षाच्या कालावधीत यापूर्वी ६ प्रशासकांनी कामकाज पाहिले. या कार्यकाळात एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमण विरोधात बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात. मार्च २०२२ पासून तिसऱ्यांदा प्रशासकीय राजवट लागू झाली. महापालिका लोकप्रतिनिधीची पाच वर्षाची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून आजतागायत शितल तेली-उगले या प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा कार्यकुशलतेने सांभाळत आहेत.

### शेवंताबाई पवार पहिल्या महिला महापौर

सोलापूर शहराच्या पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान मिळाला. मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा वर्षाच्या कार्यकाळात अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे, शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम या चार महिला महापौरांनी सलग कारभार सांभाळला. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत महापौर आणि उपमहापौर या दोन्हीही महिला होत्या. त्यावेळी शोभा बनशेट्टी या महापौर तर उपमहापौर शशिकला बत्तुल होत्या.

### दृष्टिक्षेपात अशी आहे महापालिका

- महापालिकेचे एकूण क्षेत्रफळ - १७८ चौरस किलोमीटर
- एकूण वार्षिक अंदाजपत्रक - ११५७ कोटी रुपये
- एकूण कर्मचारी - सुमारे ३४००
- महापालिकेत ११२५ कर्मचारी - अधिकाऱ्यांची पदे रिक्त
- एकूण वेतनावरील खर्च- ४१ टक्के
- विविध ३१ संवर्गासाठी - ३०२ पदाची भरती प्रक्रिया पूर्ण
- वेतन व भत्ते (पाणीपुरवठा व्यतिरिक्त) - २२१ कोटी ८ लाख रुपये
- निवृत्तीवेतन, कुटुंबवेतन -११७ कोटी ९३ लाख रुपये

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त

### पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पोलीस परेड ग्राउंडवर

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**



महाराष्ट्र राज्याच्या ६५व्या स्थापना दिनानिमित्त बुधवार, दि. १ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता पोलीस परेड ग्राउंड, पोलीस आयुक्त मुख्यालय सोलापूर येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे. २५ एप्रिल २०२४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. तर नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ७.१० वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असून प्रशासकीय इमारतीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते सकाळी ६.४५ वाजता ध्वजारोहण होणार आहे. तरी या शासकीय ध्वजारोहण समारंभास सर्व शासकीय यंत्रणा व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### श्री स्वामी समर्थ मंदीरात आजपासून धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

शहरातील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांना बुधवारपासून सुरुवात होणार असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्यावतीने देण्यात आली.बुधवार दि. १ मे रोजी सकाळी श्री स्वामी समर्थ महाराजांची महाआरती होऊन श्री स्वामी समर्थ सारामृत पारायण वाचन, सायंकाळी दिपोत्सव होणार आहे. दररोज महाराजांची महाआरती होऊन श्री स्वामी समर्थ सारामृताचे वाचन होणार आहे. ५ मे रोजी सायंकाळी बालकिर्तनकार ह भ प प्रसाद महाराज गुंड (डोणगाव) यांचे किर्तन होणार आहे. ६ मे रोजी सकाळी अभिषेक, महाआरती, पारायण वाचन होणार असून सायंकाळी ह भ प मन्मंत महाराज बहिरमल (उळेगाव) यांचे किर्तन होणार आहे. यावेळी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, भाऊसाहेब रोडगे, माऊली पवार, राम जाधव, गणेश डोंगरे, गजानन देशपांडे, धनंजय गायकवाड, रणजित डोंगरे यांच्या उपस्थितीत महाआरती होणार आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्यावतीने करण्यात आले आहे.

### कौटुंबिक कारणावरून वृध्दाला जबर मारहाण

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

कौटुंबिक कारणावरून ज्ञानदेव कुबेर (वय ७५, रा. सापटणे, टेंभुर्णी, ता. माढा) यांना चौघांना मारहाण केली.२९ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास ज्ञानदेव कुबेर हे घरासमोरील कट्टयावर बसलेले असताना त्यांना भारत कुबेर, जानका कुबेर, गणेश कुबेर, दिनेश कुबेर यांनी दगडाने डोळ्यावर मारून जखमी केले. त्यामुळे ज्ञानदेव कुबेर यांना उपचारसाठी मित्र अशोक पवार यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दारूच्या नशेत चावा घेतल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत दारूच्या नशेत चावा घेतल्याने अनिल वसंत शितोळे (वय ३५, रा. दारफळवाडी) हा तरूण जखमी झाला. २९ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास दारफळवाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिरवणुकीत अजय लोंढे याने दारूच्या नशेत उजव्या हाताला चावा घेतल्याने जखमी झाल्याने शितोळे यास मित्र दिलीप काळे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# काठी, घोंगडं अन् पिवळा फेटा

## पंतप्रधान मोदींच्या लुकने वेधले लक्ष

**'येळकोट येळकोट'... 'जय मल्हार'चा जयघोष; बाळूमामांच्या नावानं... चांगभलंही गाजवलं**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० एप्रिल-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज माढा लोकसभा मतदारसंघातील माळशिरस येथे सभा झाली. या सभेत हजारो लोकांचा जनसमुदायांनी एकच गर्दी केली होती. सकाळी साडेअकरा वाजता सुरू झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी यांनी डोक्यावर पिवळा फेटा, खांद्यावर घोंगडी आणि हातात काठी घेऊन मंचावर प्रवेश करताच उपस्थित यांनी एकच जल्लोष केला.

महाराष्ट्र राज्य धनगर समाजाच्या वतीने आ. गोपीचंद पडळकर, अँड. सोमनाथ वाघमोडे, अप्पासाहेब देशमुख, अर्जुन काळे यांनी धनगर समाजाची अस्मिता असणारी पिवळा फेटा घोंगडी अन् घुंगराची काठी आणि संत बाळूमामांची प्रतिमा देवून पंतप्रधान मोदींचा सत्कार केला. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. विशेष म्हणजे धनगरी वेशभूषेतील सत्कारानंतर भाषणाच्या सुरुवातीलाच 'येळकोट येळकोट'..'जय मल्हार'चा जयघोषही केला, तर बाळूमामांच्या नावानं... चांगभलंही गाजवलं. पंतप्रधान मोदी यांनी संपूर्ण भाषण आपल्या अंगावर घोंगडी ठेवूनच केले. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही काठी, घोगडं अन् पिवळ्या फेट्याचे आकर्षण दिसून आले.

सोमवारी सोलापुरातील होम मैदानावर भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सोलापूर जिल्ह्यातीच माढा लोकसभा मतदारसंघातील माळशिरस येथे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ मोदी यांची विराट सभा झाली.

# सोन्याचे गंठण व रोख रक्कम चोरणाऱ्या महिलेस अटक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

हातोहात महिलेच्या पर्समधील सोन्याचे गंठण व रोख रक्कम असा २ लाख ८४ हजार रुपयांचा ऐवज चोरणाऱ्या महिलेस सदर बझार पोलिसांनी अटक करून तिच्याकडून चोरीस गेलेला सर्वच्या सर्व मुद्देमाल जप्त केला.

ललिता महेश हंगरगी (जमादार) (वय ४४, रा. नंदीकुर, जि. कलबुर्गी, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ललिता हंगरगी यांची मुलगी शिल्पा लिंगराज गुत्तरगी या उपचारासाठी सोलापुरातील सनराईज हॉस्पीटलमध्ये अ‍ॅडमिट आहेत. त्यांना पाहण्यासाठी ललिता हंगरगी या हॉस्पीटलमध्ये आल्या असता हॉस्पीटलच्या बाजूस त्या नाश्ता करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी त्यांचे लेडीज पाकिट टेबलावर ठेवले होते. नाश्ता झाल्यानंतर हात धुण्यासाठी गेल्यानंतर अज्ञात महिलेने त्यांच्या लेडीज पाकिटातील चार तोळ्याचे सोन्याचे गंठण व रोख ४ हजार रुपये असा २ लाख ८४ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास करून ही चोरी करणाऱ्या एका महिलेस ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी त्या महिलेने चोरलेले गंठण व रोख रक्कम पोलिसांना काढून दिली. या गुन्ह्यात पोलिसांनी त्या महिलेला अटक केली आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे, हवालदार औदुंबर आटुळे, शहाजहान मुलाणी, संतोष मोरे, सागर गुंड, मल्लू बिराजदार, महिला कर्मचारी रेश्मा राठोड यांनी केली.

**हम हो गए तय्यार!**



- ४६० बसेस, १२०० जीप केल्या बुकींग
- अधिकारी, कर्मचारी निवडणुकीसाठी सज्ज

# मतदानाच्या पूर्वसंध्येला 'ईव्हीएम' पोहोचणार केंद्रांवर

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केल्याप्रमाणे येथील जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक ती पूर्ण तयारी केली असून, आमचे कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या टीम मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी सज्ज झाले आहेत. तर या कर्मचाऱ्यांना आणि ईव्हीएम मशीन्सला मतदानाच्या पूर्वसंध्येला घेवून जाण्यासाठी ४६० बसेस, १२०० जीप बुकींग केल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मंगळवारी (दि. ३०) दिली. जिल्ह्यात सोलापूर आणि माढा या दोन लोकसभा मतदारसंघाची निवडणूक होणार आहे. जिल्ह्यातील या दोन्ही मतदारसंघात लोकसभेचा हा उत्सव १२ एप्रिलपासून सुरू झाला असून, ७ मे रोजी मतदान पार पडल्यावरच या उत्सवाची सांगता होणार आहे. दरम्यान, यासाठी आवश्यक ते सर्व फॉर्म, स्टेशनरी तालुकास्तरावर पाठविण्यात आली आहे. तर माढा लोकसभा मतदारसंघासाठी २ हजार ३० बॅलेट मशीन आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी १ हजार ९६८ बॅलेट मशीन तयार करण्यात आल्या आहेत. एखाद्या केंद्रांवरील मशीनला जर प्राब्लेम आला तर जास्तीच्या २० टक्के मशीन तयार करुन ठेवण्यात आल्या आहेत. माढा मतदारसंघात ३२ उमेदवार आणि १ नोटाचे मतदान करण्यासाठी एका मतदान केंद्रावर ३ बॅलेट मशीन देण्यात येणार आहेत. तर सोलापूर मतदारसंघातील एका केंद्रांवर २ बॅलेट मशीन देण्यात येणार आहेत. या मशीन दि. ६ मे रोजी त्या-त्या केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आमचे कर्मचारी-अधिकाऱ्यांना मशीन हाताळणीचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. पोलिस यंत्रणेककडून आवश्यक तो बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

सोलापूर लोकसभा निवडणूक तिसऱ्या टप्प्यात होणार आहे. राज्यात ५ टप्प्यात निवडणुका होणार आहेत. त्यातील पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला काही जिल्ह्यांचे मतदान झाले आहे. सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव, लातूर व इतर ७ जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्याचे ७ मे, चौथा टप्पा १३ मे आणि पाचवा टप्पा २० मे अशा ५ टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सोलापूर जिल्ह्यात मतदानासाठी एकूण ३ हजार ६१७ मतदान केंद्रे आहेत. तसेच ३ हजार ५९९ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आहेत. जिल्ह्यामध्ये एकूण २७ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. तर सर्व केंद्रांसाठी जवळपास ४ हजार पाचशेपर्यंत ईव्हीएम मशीन आल्या आहेत. माढा मतदारसंघात मशीन्स वाढल्याने पुन्हा निवडणूक आयोगाकडून आवश्यक तितक्या मशीन मागविल्या आहेत. या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून तब्बल २२ हजाराच्यावर कर्मचारी-अधिकारी तैनात केले जाणार आहेत. या सर्वांना निवडणुकीबाबत आवश्यक ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे. दरम्यान या निवडणूक काळात आतापर्यंत १८ ते २० लेखी तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे दाखल झाल्या असून, त्याची चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाणार आहे.

**यावर्षी मतदारांचा टक्का वाढला!**

जिल्ह्यात एकूण ११ विधानसभा मतदारसंघ आहेत, त्यात एकूण पुरुष मतदार १८ लाख ७६ हजार ४९८, स्त्री मतदार १७ लाख ५० हजार २९७ व इतर मतदार २८० असे एकूण ३६ लाख २७ हजार ७५ एवढे मतदार व ४ हजार ५१९ सैनिक मतदार आहेत. यामध्ये १८-१९ वयोगटातील मतदारांची संख्या जवळपास ५२ हजार ७८३ असून २०-२१ वयोगटातील मतदार हे ७ लाख १२ हजार १४७ इतके आहेत. यात अजून चालू महिन्यातील मतदान नोंदणी वाढल्याने हा आकडा वाढण्याची शक्यता आहे.




### आजाराला कंटाळून तरूणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

आजाराला कंटाळून परशुराम शांतप्पा आसादे (वय २८, रा. अलकुंटे चौक, आंध्र व्यायाम शाळेजवळ, सोलापूर) याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. मंगळवारी पहाटे चारच्या पूर्वी परशुराम आसादे यांनी आजाराला कंटाळून घरात कपडे वाळवायच्या दोरीला गळफास घेतल्याचे दिसून आल्याने त्यांच्या नातेवाईकांनी त्यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अजय इमडे यांनी त्यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३० एप्रिल-**

कामाच्या मानसिक तणावातून अजयकुमार कृष्णाथ भोसले (वय ३५, रा. पोखरापूर, ता. मोहोळ सध्या रा. दाळे गल्ली, पंढरपूर) यांनी सोमवारी सायंकाही विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. अजयकुमार भोसले यांनी सोमवारी सायंकाळी पंढरपूर येथील नविन बस स्टॅन्डवर कामाच्या मानसिक तणावातून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना त्रास होऊ लागल्याने भाऊ अक्षय भोसलेय यांनी त्यास सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### खिशातून मोबाईलची चोरी

**सोलापूर, दि.३० एप्रिल-**

जुळे सोलापुरातील डी मार्ट समोरील रोडवरून वॉकींग करणाऱ्या व्यक्तीच्या खिशातील १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. याबाबत श्रीकांत पांडुरंग मर्तनवार (वय ४९, रा. पुरंदर अपार्टमेंट, किल्लेदार मंगल कार्यालयसमोर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ एप्रिल रोजी रात्री दहाच्या सुमारास श्रीकांत मर्तनवार हे डी मार्टसमोरील रोडवर वॉकींग करीत होते. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने कर्तनवार यांच्या शर्टच्या खिशातील १० हजार रुपये किंमतीचा














**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.